ठाणे, बुधवार दि. ३१ जुलै २०२४ वर्ष : १३, अंक : ९३ पाने : ६, किंमत : २ रुपये Maharashtra Samrat Maharashtra Samrat dainikmahasamrat@gmail.com Reg. No. THC/58/2024-2026

वर्धापनदिन
१३ वर्षांची यशस्वी घोडदौड

सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच ! ®

# दैनिक महाराष्ट्र सम्राट

मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, नवी मुंबई, रायगड, पालघर आणि पुणे येथून प्रसिद्ध

संपादक : चंद्रकांत भोईटे

अग्रलेख

**पोलिसांचे कौतुकास्पद प्रयत्न**

जादुटोणा कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी राज्यातील प्रत्येक पोलीस ठाण्यात अंधश्रद्धा निर्मूलन कक्ष स्थापन करावा, असा आदेश पोलीस महासंचालक कार्यालयाने जारी केला आहे. .......पान ४ वर

**आरक्षणाच्या शिंदे समितीला ३१ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ** ...पान २ वर

# पोलिसांनी नराधम दाऊदच्या आवळल्या मुसक्या

## उरण हत्याकांड प्रकरण

नवी मुंबई : उरण हत्याकांडामधील आरोपी दाऊद शेखच्या मुसक्या आवळण्यात पोलिसांना अखेर यश आलं आहे. यशश्रीची हत्या झाल्यापासूनच दाऊद शेख फरार होता. यशश्रीच्या शरीराची विटंबना करून तिची हत्या करणारा नराधम दाऊद शेखला शोधण्यासाठी पोलिसांनी आपली संपूर्ण यंत्रणा कामाला लावली होती. अखेर कर्नाटकातून दाऊदला ताब्यात घेण्यात पोलिसांना यश आलं आहे. दाऊद शेख व्यतिरिक्त याप्रकरणात आणखी एका व्यक्तीला अटक करण्यात आली आहे. सीसीटीव्हीतून समोर आलेल्या फुटेमध्ये हत्या झाली त्या दिवशी यशश्री शिंदे हातात काळी छत्री घेऊन जाताना दिसत होती. तिच्या पाठोपाठ अवघ्या १० मिनिटांतच दाऊद शेख जाताना दिसला होता.

उरण हत्याकांडातील मुख्य संशयित आरोपी दाऊद शेख याला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. नवी मुंबई पोलिसांनी दाऊद शेखला कर्नाटकमधून ताब्यात घेतले. यशश्री शिंदे हिची हत्या झाल्यापासून दाऊद फरार होता. दाऊद शेख याचा शोध घेण्यासाठी नवी मुंबई पोलिसांनी तब्बल सात पथकं तयार केली होती. अखेर चार दिवसांच्या शोध मोहिमेनंतर पोलिसांना दाऊदच्या मुसक्या आवळण्यात यश आले आहे. यशश्रीची हत्या झाल्यानंतर दाऊद



फरार झाला होता. पोलीस त्याच्या मागावर होते, परंतु दाऊद शेख सातत्यानं लोकेशन बदलत होता. अखेर गुन्हे शाखेच्या पोलिसांनी दाऊदला कर्नाटकमध्ये पकडलं आहे.

## यशश्रीसोबत नेमकं काय घडलं?



उरणमधील यशश्री शिंदे या २२ वर्षीय तरुणीची निर्घृणपणे हत्या करण्यात आल्याची घटना नुकतीच उघडकीस आली. एकतर्फी प्रेमातून गेल्या अनेक वर्षांपासून तिच्या मागावर असलेल्या नराधमाने यशश्रीला अक्षरश: हालहाल करुन ठार मारल्याची माहिती समोर आली. यशश्रीच्या मारेकऱ्यानं निर्दयीपणे तिच्यावर वार केले, तिच्या शरीराची अक्षरशः विटंबना केली. तिच्या गुप्तांगावर आणि पोटावर अनेक वार करुन यशश्रीचा मृतदेह छिन्नविछिन्न करण्यात आला होता. त्यानंतर उरणमधील सगीर ब्रदर्स पेट्रोल पंपामागील मैदानावरील झुडुपांमध्ये तिचा मृतदेह फेकून देण्यात आला.

यशश्रीच्या वडिलांनी पोलिसांना दिलेल्या जबाबात एका दाऊद शेख नामक व्यक्तीचा उल्लेख केला. त्याच्याकडून मृत्यूपूर्वी यशश्रीवर बलात्कार करण्यात आला होता का? याची वैद्यकीय तपासणीही करण्यात आली. या घटनेनंतर दाऊद शेख या आरोपीला पकडण्यासाठी नागरिकांनी पोलिसांवर प्रचंड दबाव निर्माण केला आहे. दाऊद शेख यानं यशश्री शिंदे १५ वर्षांची असतानाही तिच्यावर अत्याचार केले होते. दाऊद शेख हा एक ट्रक ड्रायव्हर आहे. त्याने २०१८ साली पहिल्यांदा यशश्री शिंदे हिला पाहिले. त्यावेळी यशश्री १५ वर्षांची होती. दाऊद शेखनं त्यावेळी यशश्रीला आपल्या जाळ्यात ओढले आणि २०१९ साली त्यानं तिच्यावर अत्याचार केले होते. त्यावेळी यशश्री शिंदे हिच्या कुटुंबीयांच्या तक्रारीनुसार दाऊद शेख याच्यावर पॉक्सो कलमांतर्गत गुन्हा दाखल करुन त्याची तुरुंगातून रवानगी करण्यात आली होती. अलीकडेच तो तुरुंगातून सुटला होता. यानंतर त्यानं पुन्हा यशश्रीचा पाठलाग करायला सुरुवात केली. दाऊद शेख सतत यशश्रीला फोन करायचा. अखेर २५ जुलैला ती घराबाहेर पडल्यानंतर दाऊद शेखनं तिला गाठून तिची हत्या केल्याचा संशय आहे. गुरुवारी दुपारी दीडच्या सुमारास मैत्रिणीच्या घरी जाण्यासाठी यशश्री पनवेल स्टेशनकडे गेली. सायंकाळी साधारण साडेचारनंतर तिचा फोन बंद झाला. त्यानंतर यशश्री कोणालाच दिसली नाही. पोलिसांकडून याप्रकरणी अधिक तपास सुरू आहे.

## यशश्री–दाऊदची जुनी ओळख, पण ३–४ वर्षात भेटले नव्हते, भेटल्यानंतर वादातून हत्या, पोलिसांनी घटनाक्रम सांगितला!

मुंबई : उरण येथील २२ वर्षीय तरूणी यशश्री शिंदेची निघृण हत्या करण्यात आली. यशश्रीची हत्या झाल्यापासून मुख्य आरोपी दाऊद शेख फरार होता. अखेर दाऊदला कर्नाटकातून काल सकाळी ताब्यात घेण्यात आले आहे. यानंतर पोलिसांनी नवी मुंबईत प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना यशश्री शिंदे हिच्या हत्येचा घटनाक्रम सांगितला आहे. (पान ४ वर)

- **यशश्री–दाऊदची जुनी ओळख, पण...**
- **भेटल्यानंतर वादातून हत्या**

## दाऊद शेखला अटक झाल्यानंतर यशश्रीच्या आईची थेट मागणी; म्हणाली, टॉर्चर करून त्याला...

नवी मुंबई – उरणमध्ये यशश्री शिंदे या २२ वर्षीय तरुणीची २५ जुलै रोजी निर्घृण हत्या करण्यात आली होती. याप्रकरणी २७ जुलै रोजी अज्ञाताविरोधात गुन्हा दाखल झाला होता. तर, आता आरोपी दाऊद शेख याला आज कर्नाटकातून अटक करण्यात आली आहे. अटक केल्यानंतर त्याने गुन्ह्याची कबुली दिली असून त्याची अधिक चौकशी सुरू आहे.दरम्यान, यावरून यशश्रीच्या आईने अंत्यत संतप्त प्रतिक्रिया दिली आहे. एबीपी माझाला दिलेल्या मुलाखतीत त्या बोलत होत्या.

माझ्या मुलीला जेवढा त्रास झाला तेवढंच त्यालाही टॉर्चर करून फाशी दिली पाहिजे. हे प्रकरण फॅस्ट ट्रॅकवर चालवलं पाहिजे. माझ्या मुलीप्रमाणे ज्या मुली तडफडून गेल्या आहेत, त्यांनाही न्याय द्या. म्हणजे माझ्या लेकीलाही समाधान मिळेल. पण माझ्या मुलीला त्याने जेवढा त्रास दिला तेवढाच त्रास त्याला द्या आणि फाशी द्या. सध्या प्रकरण चर्चेत आहे म्हणून शिक्षेचं आश्वासन दिलं जाईल. पण त्याला फाशी दिलीच पाहिजे, असं यशश्रीच्या आईने सांगितलं. प्रशासनाने या प्रकरणात कडक कायदा तयार केला पाहिजे. निर्भया प्रकरण झाल्यानंतर सरकारला जाग आणि कायदे तयार केले गेले. पण असे प्रकार सातत्याने घडत आहेत. त्यामुळे कायद्यात कठोर तरतूद केल्या पाहिजे, अशी मागणी यशश्रीच्या वडिलांनी केली आहे.

## देवेंद्र फडणवीस भाजपाचे नवे राष्ट्रीय अध्यक्ष? मोदी भेटीनंतर दिल्लीत चर्चांना उधाण

नवी दिल्ली – लोकसभा निवडणुकीनंतर भाजपा नव्या राष्ट्रीय अध्यक्षाच्या शोधात आहे. एक नेता एक पद या धोरणानुसार सध्या भाजपाचे अध्यक्ष जेपी नड्डा हे मोदींच्या मंत्रिमंडळातही मंत्री आहेत. यामुळे त्यांच्या जागी कोण येणार, असा प्रश्न विचारला जात आहे. नड्डा यांच्या उत्तराधिकाऱ्याच्या नावांवर चर्चा केली जात आहे. अशातच भाजपाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदासाठी महाराष्ट्रातून बड्या नेत्याचे नाव पुढे येत आहे. खरोखरच असे झाले तर महाराष्ट्रातून ते दुसरे अध्यक्ष असणार आहेत.

नड्डा आरोग्य मंत्री झाले आहेत. यामुळे सर्व चर्चा, शक्यतांवर महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे नाव समोर येत आहे. फडणवीस यांनी सपत्नीक दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली होती. या भेटीनंतर राजकीय वर्तुळात मोठी चर्चा सुरु झाली आहे. (पान ४ वर)



**फडणवीस का?** फडणवीसांच्या विरोधात मराठा आंदोलकांमध्ये रोष आहे. लोकसभेला याच वातावरणामुळे फटका बसला होता. फडणवीसांनाच जर केंद्रात घेतले तर हा रोष कैकपटींनी कमी करता येणार आहे. फडणवीसांची ब्राम्हण जात, वरिष्ठ नेतृत्वाशी चांगले संबंध त्यांना राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून लाँच करण्यासाठी पुरेसे आहेत. फडणवीसांपूर्वी महाराष्ट्रातूनच विनोद तावडेंचे नाव चर्चेत आले होते. यानंतर सुनील बन्सल यांचेही नाव चर्चेत आले होते. या सर्वांमध्ये फडणवीसांचे नाव सर्वात पुढे असल्याचे सांगितले जात आहे.









# ठाण्यात मनोरंजन, हिमोद्यानासाठी हालचाली

**जागा आरक्षण फेरबदलाचा प्रस्ताव शासनाकडे सादर**
**उद्यान उभारणीसाठी पालिकेने काढली निविदा**

ठाणे : गेले अनेक वर्षे कागदावर असलेल्या मनोरंजन (म्युजमेंट पार्क) आणि हिमोद्यान (स्नो पार्क) प्रकल्पाचा सविस्तर आराखडा तयार करून पालिका प्रशासनाने हा प्रकल्प प्रत्यक्षात उतरविण्यासाठी हालचाली सुरू केल्या आहेत. कोलशेत परिसरात दीड लाख चौरस मीटर क्षेत्रावर खासगी लोकसहभागातून विकसित करण्यात येणाऱ्या या प्रकल्पासाठी जागा आरक्षण फेरबदलांचा प्रस्ताव पालिका प्रशासनाने शासनाकडे महिनाभरापुर्वी मंजुरीसाठी सादर केला असून त्यापाठोपाठ आता प्रकल्प उभारणीच्या कामासाठी ठेकेदार निश्चित करण्यासाठी निविदा प्रक्रियेला सुरूवात केली आहे. यामुळे ठाणेकरांना नमो सेंट्रल पार्क पाठोपाठ मनोरंजनाचे नवे ठिकाण उपलब्ध होण्याची चिन्हे आहेत.

### काय आहे प्रकल्प : उद्यान सुविधा

कॉफी कप, सन एड मुन, फॅमिली रोलर-कोस्टर, सिक्स रिंग-रोलर कोस्टर, कोरीजील, स्टिंग टॉवर ४५ मीटर, ड्रॉप टॉवर, डिस्को कोस्टर जायंट व्हील, पेंन्ड्युलम आणि फॅन्टसी प्लॅनेट अशा सुमारे आठ ते दहा ड्राय राईड्स असतील.

### इतर सुविधा व आर्कषण

९ डी सिनेमा, एचडी सिनेमा, हॉरर हाऊस, मोटर मेज, इको पार्क आणि नेचर ट्रेल, वाहनतळ, उपहारगृह, दुकाने, प्रदर्शन सभागृह, कार्यक्रम सभागृह, अंतर्गत खेळाचे प्रकार, हॅप्पी स्ट्रीट अशा सुविधा असणार आहेत. ५०० नागरिक हिमोद्यानात एकाच वेळी फिरू शकतील, अशी व्यवस्था. उद्यानात कपडे बदलण्याची जागा, वातानुकूलित क्षेत्र, डिजिटल आणि फोटोशॉप, तिकीट कक्ष असेल.

■ ठाणे येथील कोलशेत भागातील पार्कसिटी गृहप्रकल्पाच्या परिसरातील सुमारे २०.५ एकर जागेवर 'नमो द ग्रँड सेंट्रल पार्क'ची उभारणी करण्यात आली आहे. ठाणे महापालिकेने बांधीव हस्तांतरण विकास हक्क (कन्स्ट्रक्शन टीडीआर) च्या माध्यमातून कल्पतरु विकासकाकडून हे उद्यान विकसित करून घेतले आहे. या उद्यानास नागरिकांची पसंती मिळत असतानाच, त्यापाठोपाठ आता याच भागात मनोरंजन (म्युजमेंट पार्क) आणि हिमोद्यान (स्नो पार्क) प्रकल्प उभारण्यासाठी पालिकेने पाऊले उचलली आहे. २०१७ मध्ये पालिका प्रशासनाने या प्रकल्पास मान्यता दिली होती. परंतु गेले अनेक वर्षे हा प्रकल्प विविध कारणांमुळे कागदावरच असल्याचे चित्र होते. दरम्यान, गेल्यावर्षी पासून पालिका प्रशासनाने हा प्रकल्प प्रत्यक्षात उतरविण्यासाठी हालचाली सुरू केल्या असून त्याचाच एक भाग म्हणून गेल्यावर्षी पालिकेने सल्लागार कंपनीची नियुक्ती करून प्रकल्पाचा सविस्तर आराख़डा तयार केला होता.

■ कोलशेत परिसरात दीड लाख चौरस मीटर क्षेत्रावर खासगी सहभागातून मनोरंजन आणि हिमोद्यान उद्यान विकसित करण्याचे प्रस्तावित आहे. या प्रकल्पाच्या जागेवर महापालिकेच्या विकास आराखड्यात पार्क आरक्षण अशी नोंद आहे. या जागेवर मनोरंजन आणि हिमोद्यान उद्यान विकसित करायचे असेल तर त्याठिकाणी म्युजमेंट पार्क व कन्हेन्शन सेंटर असा आरक्षण फेरबदल करणे आवश्यक आहे. यामुळे महापालिका विकास आराखड्यात तसेच एकत्रितकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीमध्ये जागा फेरबदल करण्याचा प्रस्ताव प्रशासनाने तयार केला आहे. त्यावर आलेल्या हरकती आणि सुचनांवर आयुक्तांनी निर्णय घेऊन हा प्रस्ताव अंतिम मान्यतेसाठी शासनाकड़े सादर करण्याकरिता प्रशासकीय सर्वसाधारण सभेने महिनाभरापुर्वी मान्यता दिली आहे. त्यापाठोपाठ पालिका प्रशासनाने या प्रकल्पाच्या उभारणीसाठी ठेकेदार निश्चित करण्याकरिता निविदा प्रक्रीयेला सुरूवात केली असून त्यासाठी पालिकेने निविदा काढल्या आहेत.

# आरक्षणाच्या शिंदे समितीला ३१ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ

**मुंबई : राज्यातील मराठा आरक्षणाचा प्रश्न गंभीर बनला असतानाच आता पुन्हा एकदा राज्य सरकारने मराठा आरक्षणासंदर्भात गठीत केलेल्या शिंदे समितीला मुदतवाढ दिली आहे. विशेष म्हणजे आता या समितीला थेट ३१ डिसेंबरपर्यंतची मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यामुळे, आता मराठा आरक्षणाच्या विषयी या समितीकडून थेट विधानसभा (तळवहरपीरलहर) निवडणुकांच्या नंतरच अहवाल सादर केला जाणार असल्याचे स्पष्ट झालं आहे. यापूर्वीही अनेकदा या समितीला सरकारकडून मुदतवाढ देण्यात आली होती. आता, थेट ५ महिन्यांची मुदतवाढ दिल्यामुळे, मराठा आरक्षणासाठी लढा देणारे उपोषणकर्ते मनोज जरांगे (चरपेक्ष गरीरपसश) पाटील काय भूमिका घेतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.**

मराठा आरक्षणासाठी लढा देणारे उपोषणकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी उपोषण स्थगित करुन आता विधानसभा निवडणुकांची तयारी सुरू केली आहे. १३ ऑगस्ट रोजी ते आपली भूमिका जाहीर करणार आहेत. मात्र, तत्पूर्वी सरकारकडून त्यांना आरक्षण व सगेसोयरे अध्यादेशाच्या अंमलबजावणीबाबत अपेक्षा होती. मात्र,

## आता विधानसभेनंतरच अहवाल




या दोन्ही मुद्द्यांवर काम करणाऱ्या समितीला आणखी मुदतवाढ देण्यात आली आहे. मराठा कुणबी नोंदी शोधण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या न्या. शिंदे समितीला राज्य सरकारने पुन्हा एकदा मुदतवाढ दिली आहे. मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देऊन ओबीसी प्रवर्गातून आरक्षण देण्याची मागणी करण्यात येत होती. या मागणीला अनुसरून राज्य सरकारने निवृत्त न्यायाधीश संदीप शिंदे यांच्या नेतृत्त्वात एक समिती स्थापन केली आहे, त्या समितीला अहवाद सादर करण्यासाठी सातत्याने मुदतवाढ देण्यात आली आहे. आता, चक्क ५ महिन्यांची मुदतवाढ देण्यात आली असून ३१ डिसेंबरपर्यंतची ही मुदतवाढ आहे.

मनोज जरांगे यांच्या उपोषणानंतर राज्य सरकारने राज्यातील कुणबी-मराठा आणि मराठा-कुणबी जातीचा शोध घेऊन प्रमाणपत्र देण्याची पद्धत निश्चित करण्यासाठी शिंदे समिती स्थापन केली होती. राज्यातील मराठा- कुणबी, कुणबी-मराठा जातीच्या नोंदीसाठी आवश्यक पुराव्यांची तपासणी करणे आणि प्रमाणपत्र देण्याची कार्यपद्धती निश्चित करण्याचे काम शिंदे समितीकडून सुरू आहे. या समितीकडून मराठा आरक्षणाबाबत कुणबी असल्याचे दाखले शोधण्याचे काम सुरू आहे. त्यासाठी मराठवाड्यासह राज्यातील इतर भागांमध्ये समितीचे दौरे पार पडले आहेत. विविध ठिकाणचे दस्ताऐवज तपासून मराठा समाज हा कुणबी

### समितीने ३१ ऑक्टोबर रोजी पहिला अहवाल दिला

यापूर्वी न्या. शिंदे समितीचा पहिला अहवाल ३१ ऑक्टोबर रोजी राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत स्वीकारण्यात आला होता. शिंदे समितीला फारशी, उर्दू आणि अन्य भाषेतील दस्तऐवजांचे भाषांतर करण्यासाठी पुरेसा वेळ आहे. त्यासाठी सरकारने समितीला पुन्हा एकदा २९ फेब्रुवारीपर्यंत मुदतवाढ दिली आहे. डिसेंबर महिन्यात शिंदे समितीने आपला दुसरा अहवाल सरकारला सादर केला होता. या अहवालामध्ये मराठा समाजाला जात प्रमाणपत्र देण्यासाठी आवश्यक भूमि अभिलेख विभागातील कागदपत्रे सादर करण्यात आली आहे. या कागदपत्रांमध्ये मराठा समाजाला जात प्रमाणपत्र देण्यासाठीच्या आवश्यक नोंदी असल्याची माहिती सूत्रांनी दिली. तसेच, १९६७ पूर्वीच्या या नोंदी असल्यामुळे जात वैधता पडताळणी समितीसमोर जात प्रमाणपत्र सादर केल्यावर अडचणी येणार नसल्याचं अहवालात म्हटले आहे. तसेच, शिंदे समितीकडून तब्बल मराठा कुणबी, कुणबी मराठा आशा ५४ लाख नोंदी मिळाल्याची अहवालात नोंद असल्याची देखील माहिती सूत्रांनी दिली आहे.

**शिवसंस्कृती सामाजिक व बहुउद्देशीय ट्रस्ट मार्फत**

# गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप




ठाणे - शिवसंस्कृती सामाजिक व बहुउद्देशीय ट्रस्ट मार्फत शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी सरदार श्रीमंत जिवाजी सुभानजी रणनवरे/रणवरे यांच्या समाधीच्या पावन स्थळी निमसाखर, ता. इंदापुर, जि. पुणे येथील जिल्हा परिषद शाळा व एन.ई.एस. हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज, निमसाखर येथील गरजु विद्यार्थ्यांना शालेय गणवेश, दप्तर, वह्या, अंकलिपी, कंपास, कलर खडू, पेन, पेन्सिल, शार्पनर, खोडरबर इ. शैक्षणिक साहित्य पुरविण्यात आले.

उपक्रमाच्या सुरुवातीला जिल्हा परिषद शाळेमध्ये छत्रपती श्री शिवरायांच्या प्रतिमेचे पूजन करून मान्यवरांचे स्वागत करण्यात आले आणि शाळेसाठी शिवरायांची तेजोमय प्रतिमा अर्पण करण्यात आली. त्यांनतर विद्यार्थ्यांना खाऊ देण्यात आला व मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

त्यानंतर एन.ई.एस. हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज येथे छत्रपती श्री शिवरायांच्या प्रतिमेचे पूजन करून संस्थेचे दिवंगत उपाध्यक्ष व समाजसेवक कै. संजय सूर्यकांत रणवरे (पप्पू पाटील) यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली आणि त्यांच्या स्मरणार्थ गावातील गरजू विद्यार्थ्यांना आवश्यक असलेले शैक्षणिक साहित्य पुरविण्यात आले.

या उपक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून विठ्ठल रुक्मिणी ट्रस्ट, हडपसरचे संस्थापक आणि आध्यात्मिक वारकरी गुरुकुल, पुणेचे समन्वयक श्री. प्रमोद दादा जयसिंगराव रणनवरे हे उपस्थित होते. तसेच संस्थेचे सचिव श्री. धनंजय रणवरे, मुख्यध्यापक श्री. चंद्रकांत रणवरे, सर्व शिक्षक वर्ग व ग्रामस्थ हजर होते. मान्यवरांचे शाल व श्रीफळ तसेच छत्रपती श्री शिवरायांची तेजोमय प्रतिमा देऊन स्वागत करण्यात आले.

या उपक्रमामध्ये आपला ऐतिहासिक वारसा जपण्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करून निमसाखर गावाला लाभलेला एक मोठा ऐतिहासिक ठेवा जतन करण्यासाठी सहभागी होण्याचे ट्रस्ट मार्फत उपस्थित शिवभक्तांना आवाहन करण्यात आले. तसेच या दोन्ही शाळांमधील विद्यार्थ्यांना छत्रपती श्री शिवराय, छत्रपती श्री शंभुराजे व स्वराज्यासाठी लढलेल्या सर्व मावळ्यांच्या इतिहासाबद्दल प्रत्यक्ष समाधीस्थळी घेऊन जाऊन मुलांमध्ये इतिहासाप्रती आवड निर्माण होण्यासाठी विविध ऐतिहासिक उपक्रम राबविण्याचे शाळा प्रशासनाला आवाहन करण्यात आले. कार्यक्रमाच्या शेवटी ही शैक्षणिक मदत उपलब्ध करण्यासाठी ट्रस्टला सहकार्य केलेले सर्व देणगीदार व हितचिंतक यांचे संचालक मंडळ व शाळा प्रशासनाकडून आभार मानण्यात आले.

त्यानंतर उपस्थित असलेले प्रतिष्ठीत मान्यवर व ग्रामस्थ यांच्यासोबत सरदार श्रीमंत जिवाजी सुभानजी रणनवरे/रणवरे यांच्या समाधी स्थळाची साफसफाई व पुजन करण्यात आले. तसेच समाधीस्थळाची पाहणी करून समाधी व सभोवतालच्या परिसराची देखभाल निरंतरपणे चालू राहण्याबाबत व हा ऐतिहासिक वारसा जतन करण्यासाठी आवश्यक पुढील वाटचाली संदर्भात ग्रामस्थांसोबत चर्चा करण्यात आली. या उपक्रमावेळी ट्रस्टचे विश्वस्त श्री. शशिकांत रणवरे, श्री. अमर रणवरे, श्री. विनय गावडे, श्री. गणेश रणवरे तसेच श्री. नितीन गायकवाड, श्री. दत्तात्रेय पवार हे उपस्थित होते.

# शहापूर, मुरबाड एस. टी. बस आगारांची पुनर्बांधणी; १३ कोटीची तरतूद, निविदे प्रक्रियाला सुरूवात

कल्याण - ठाणे जिल्ह्यातील शहापूर, मुरबाड या पडझड झालेल्या महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळांच्या बस आगारांची पुनर्बांधणी करण्याचा निर्णय परिवहन विभागाने घेतला आहे. या दोन्ही एस. टी. बस आगारांच्या पुनर्बांधणीसाठी शासनाने १३ कोटी ३८ लाख ८१ हजार ८४८ रूपयांची तरतूद केली आहे. शहापूर बस स्थानकाच्या पुनर्बांधणीसाठी तीन कोटी ६९ लाख ६२ हजार ७१६ रूपये, मुरबाड बस आगारासाठी नऊ कोटी ६९ लाख १९ हजार १३२ रूपयांची तरतूद करण्यात आली आहे. राज्य परिवहन महामंडळाच्या कुर्ला येथील कार्यकारी अभियंत्यांनी या बस आगारांच्या पुनर्बांधणीची निविदा प्रक्रिया सुरू केली आहे.

मागील ३५ ते ४० वर्षापूर्वी शहापूर आणि मुरबाड एस. टी. बस आगारांची नव्याने उभारणी करण्यात आली होती. दरम्याच्या काळात या आगारांची किरकोळ दुरुस्ती करण्यात येत होती. चाळीस वर्षापासुनच्या या दोन्ही बस आगारांच्या या दोन्ही वास्तू धोकादायक झाल्या होत्या.



अशा प्रकारे सामाजिक उपक्रम राबवून आमदार जितेंद्र आव्हाड यांचा वाढदिवस साजरा करण्यात येत आहे.५ ऑगस्ट रोजी आमदार जितेंद्र आव्हाड यांच्या वाढदिवसानिमित्त मुंब्रा वासियांसाठी मोफत मोतीबिंदू शिबिराचे देखील आयोजित करण्यात आले असून या शिबिराला आमदार जितेंद्र आव्हाड उपस्थित राहणार आहेत. तरी नागरिकांनी देखील आयोजित या शिबिरांचा लाभ घ्यावा असे आव्हान समाजसेविका मर्जिया शानू पठाण यांनी केले.

**आमदार जितेंद्र आव्हाड यांच्या वाढदिवसानिमित्त....** मुंब्रा येथे मोफत विविध सरकारी दाखले व योजनांचे भव्य शिबीर आयोजित करण्यात आले आहेत.माजी विरोधी पक्षनेते अशरफ शानू पठाण व समाजसेविका मरजिया शानू पठाण यांच्या वतीने मुंब्रा, अमृतनगर येथे आमदार जितेंद्र आव्हाड यांच्या वाढदिवसानिमित्त मोफत विविध सरकारी दाखले व योजनांचे भव्य शिबीर आयोजित करण्यात आले आहेत. ५ ऑगस्ट पर्यंत आयोजित करण्यात आलेल्या शिबिरात आधार कार्ड,मतदान कार्ड,आयुष्यमान कार्ड,ई श्रम कार्ड,डोमिसाईल सर्टिफिकेट,जेष्ठ नागरिक कार्ड,उत्पन्नाचा दाखल,तसेच माझी लाडकी बहीण योजना आदी सरकारी दाखले व योजनांचे शिबीर आयोजित करण्यात आले आहे. या शिबिराला स्थानिक नागरिकांनी मोठी गर्दी केली असून या शिबिराचा लाभ घेत आहेत. (छाया - मनोज सिंह)



ठाणे, बुधवार दि. ३१ जुलै २०२४ वर्ष : १३, अंक : ९३ पाने : ६, किंमत : २ रुपये
Maharashtra Samrat Maharashtra Samrat dainikmahasamrat@gmail.com Reg. No. THC/58/2024-2026

वर्धापनदिन
१३ वर्षांची यशस्वी घोडदौड

सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच ! ®

दैनिक महाराष्ट्र सम्राट

मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, नवी मुंबई, रायगड, पालघर आणि पुणे येथून प्रसिद्ध
संपादक : चंद्रकांत भोईटे





महापालिका आयुक्त डॉ. इंदु राणी जाखड़ यांची टिटवाळा येथील रुक्मिणी प्लाझा प्रसुतीगृहास भेट

...पान ५ वर

कायदा हातात घ्यावा लागला तरी आम्ही ते करू प शिवसेना महिला आघाडीचा युती सरकारला इशारा, मुख्यमंत्र्यांच्या ठाण्यातच लाडकी बहीण सुरक्षित नाही

...पान ५ वर

ई-पेपरसाठी नियमित पहा...
ePaper PDF
www.maharashtrasamrat.com

**तापमान**

| कमाल | किमान |
|---|---|
| ३६° से | २९° से |

**बाजार**

| सोने | चांदी |
|---|---|
| ७३,३४० | ८९,८५० |

**डोकं खाजवा** –अशोक सुतार



आपल्या पक्षात वादग्रस्त हिरॉईन घेतली पाहिजे. त्यानिमित्त का होईना पक्षाला लोकप्रियता मिळेल.

**थोडक्यात घडामोडी**



### दोन सिग्नल यंत्रणेत बिघाड झाल्याने मध्ये रेल्वेची वाहतूक विस्कळीत

मुंबई– दोन सिग्नल यंत्रणेत बिघाड झाल्याने मध्य रेल्वेची वाहतूक विस्कळीत झाली. त्यामुळे सीएसएमटी रेल्वे स्थानकाजवळ अनेक लोकल एकापाठोपाठ उभ्या राहिल्या होत्या. त्यामुळे प्रवाशांचे हाल झाले. सिग्नल यंत्रणा दुरुस्तीचे काम उशीरापर्यंत चालू होते. सुमारे एक तास रेल्वेचा खोळंबा झाला होता. त्यामुळे सर्वच रेल्वे स्थानकांवर प्रवाशांची मोठी गर्दी बघायला मिळाली. सिग्नल यंत्रणा दुरुस्त होताच लोकल वाहतूक सुरळीत करण्यात आली.

# लाडक्या बहिणीसाठी GR निघाला | 3 सिलेंडर मोफत मिळणार

प्रधानमंत्री उज्वला योजनेतील लाभार्थ्यांना, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील लाभार्थ्यांना मिळणार लाभ

**मुंबई: राज्यातील लाडक्या बहिणींसाठी मुख्यमंत्री एकनाथ यांनी आणखी एक मोठी घोषणा केली आहे. राज्यातील महिलांना वर्षाला तीन गॅस सिलेंडर मोफत मिळणार असल्याचा जीआर आज राज्य सरकारने प्रसिद्ध केला आहे. केंद्र सरकारच्या प्रधानमंत्री उज्वला योजनेच्या राज्यातील सुमारे ५२.१६ लाख लाभार्थ्यांना, तसेच मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या पात्र लाभार्थ्यांच्या कुटुंबाना वर्षाला ३ गॅस सिलिंडरचे पुनर्भरण मोफत उपलब्ध करून देणारी, मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजना लागू करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे.**

### योजनेची पात्रता आणि निकष काय ?

- या योजनेचा लाभ मिळण्यासाठी गॅस जोडणी महिलेच्या नावाने असणे आवश्यक आहे.
- राज्यातील प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेंतर्गत पात्र असलेले लाभार्थी या योजनेसाठी पात्र असणार आहेत.
- मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेस पात्र असलेल्या लाभार्थ्यांचे कुटुंब या योजनेस पात्र असणार आहे.
- एका कुटुंबात शिधापत्रिकेनुसार केवळ एक लाभार्थी या योजनेस पात्र असेल.
- तसेच फक्त १४.२ किलोग्रॅम वजनाच्या गॅस सिलेंडरची जोडणी असलेल्या गॅस ग्राहकांना ही योजना लागू असेल.




### योजनेची कार्यपद्धती नेमकी काय ?

प्रधानमंत्री उज्वला योजनेच्या लाभार्थ्यांना गॅस सिलिंडरचे नियमित वितरण हे तेल कंपन्यांमार्फत करण्यात येते. मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजने अंतर्गत द्यावयाच्या ३ मोफत गॅस सिलिंडचे वितरणही तेल कंपन्यामार्फत करण्यात येईल. केंद्र सरकारच्या ३०० रुपये अनुदाना व्यतिरिक्त राज्य शासन ५३० रुपये प्रति सिलिंडर इतकी रक्कम लाभार्थ्यांचा थेट बँक खात्यात जमा करण्यात येईल. तसेच मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील पात्र लाभार्थी यांना प्रति सिलिंडर ८३० रुपये (पान ४ वर)

# हावडा-मुंबई एक्सप्रेसला झारखंडमध्ये अपघात; १८ डबे रुळावरून घसरले



झारखंडमध्ये मोठा रेल्वे अपघात झाला असून चक्रधरपूर जवळील बारा बंबू गावानजीक हा अपघात झाला. हावडा-मुंबई मेल या गाडीला हा भीषण अपघात झाला असून या अपघातात रेल्वेचे १८ डबे रुळावरून घसरले आहेत. ही रेल्वे हावड्यावरून (पश्चिम बंगाल) मुंबईच्या दिशेने जात होती. या रेल्वे दुर्घटनेमध्ये आतापर्यंत सहा जण जखमी झाले असून दोन जणांचा मृत्यू झाल्याची माहिती आहे. सर्व जखमी प्रवाशांना उपचारसासाठी रवाना करण्यात आले आहे.

हावडा- सीएसएमटी (मुंबई) एक्सप्रेस, ट्रेन नंबर १२८१० ही चक्रधरपूर डिव्हीजनमधील बारा बंबू गावानजीक रुळावरून घसरली. ही मेल हावड्यावरून मुंबईला जात होती. या दुर्घटनेची माहिती मिळताच रेल्वेचे अधिकारी आणि स्थानिक पोलीस घटनास्थळी रवाना झाले आहेत. पहाटे ३.४५ च्या सुमारास हा अपघात झाला. गाडीचे १८ डबे घसरले असून यापैकी १६ प्रवासी डबे, एक पॉवर कार आणि एक पॅन्ट्री कार होती, अशी माहिती आहे.

या दुर्घटनेनंतर रेल्वे प्रशासनाने प्रवाशांसाठी एक हेल्पलाईन सुरू केली आहे. टाटानगर- ०६५७२२९०३२४, चक्रधरपूर- ०६५८७ २३८०७२, हावडा- ९४३३३५७९२० आणि रांची- ०६५१-२७-८७११५ हे हेल्पलाईन नंबर रेल्वेने जारी केले आहेत. दरम्यान, या मार्गावरील तीन गाड्या रद्द करण्यात आल्या आहेत, तर एक गाडी शॉर्ट टर्मिनेट करून इतर मार्गावरून वळवण्यात आली आहे. हावडा-कांताबंजी इस्पात एक्स्प्रेस (२२८६१), खरगपूर-धनबाद एक्स्प्रेस आणि हावरा-बार्बिल एक्स्प्रेस या गाड्या रद्द करण्यात आल्या आहेत. तर दक्षिण बिहार एक्स्प्रेस (१३२८८) इतर मार्गावरून वळवण्यात आली आहे. तर, आसनसोल टाटा मेमू पास स्पेशल ट्रेन (०८१७३) हिचा प्रवास आद्रा येथे संपवण्यात आला आहे.

प्रत्यक्षदर्शींनी या अपघाताबाबत सांगितलं की, रात्री रेल्वे स्थानकावर असताना ३.४५ च्या सुमारास मोठा आवाज आला. आवाजाच्या दिशेने पाहिल्यास दिसलं की एक रेल्वे हलत आहे आणि एका बाजूला झुकली आहे. शिवाय काही प्रवासी पडतायत असं वाटत होतं. रेल्वेचे काही डबे रुळावरून घसरल्याचं लक्षात आलं. दरम्यान, रेल्वे प्रशासनाने म्हटलं आहे की सर्व जखमी प्रवाशांना घटनास्थळी प्रथमोपचार देण्यात आले आहेत. तसेच हा अपघात कशामुळे झाला? या गोष्टींचा तपास केला जात आहे.

# नेपाळच्या १२ वर्षीय मुलीवर बदलापुरात अत्याचार

पोलीस सुत्राने दिलेल्या माहितीनुसार १२ वर्षीय पीडित अल्पवीयन मुलगी मूळची नेपाळ देशात राहणारी असून रोजीरोटीच्या शोधात ती कुटूंबासह भारतात आली आहे

**ठाणे : गुन्हेगारीच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ होत असून महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर होत चालला आहे. नवी मुंबईतील उरणमधील हत्याकांडामुळे महिला व मुलींच्या सुरक्षेचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. मात्र, विनयभंग, बलात्काराच्या घटना कमी होताना दिसून येत नाही. आता, बदलापूरमधील एक धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. येथील एका १२ वर्षीय पीडित अल्पवीयन मुलीवर घरात घुसुन बळजबरीने एका अज्ञात नराधमाने अत्याचार केल्याचं उघडकीस आलं आहे. धक्कादायक बाब म्हणजे अत्याचाराच्या घटनेमुळं पीडित मुलगी गर्भवती राहिल्यानंतर ही घटना उघडकीस आली.**

- गर्भवती राहिल्याने क्रूर कृत्य समोर
- १० दिवसांपासून नराधमाचा शोध



याप्रकरणी बदलापूर पूर्व पोलीस ठाण्यात अज्ञात नरधमावर अत्याचारासह विविध कालमानुसार गुन्हा दखल करत पोलिसांनी तपास सुरू केला आहे. मात्र, पोलिसांकडून अद्यापही आरोपीला अटक करण्यात आलेली नाही.

पोलीस सुत्राने दिलेल्या माहितीनुसार १२ वर्षीय पीडित अल्पवीयन मुलगी मूळची नेपाळ देशात राहणारी असून रोजीरोटीच्या शोधात ती कुटूंबासह भारतात आली आहे. पीडितेच कुटूंब कामाच्या शोधात असताना त्यांना बदलापूर पूर्व भागातील नव्याने सुरू असलेल्या इमारतीच्या बांधकाम साईटवर काम आणि राहण्यास निवारा म्हणून एक खोली देण्यात आली. त्यातच २०२४ च्या जून महिन्यात पीडित मुलगी सायंकाळच्या सुमारास खोलीत एकटीच असल्याचा फायदा घेऊन अज्ञात नराधमाने तिच्या खोलीत प्रवेश केला. त्यानंतर, तिच्यावर अत्याचार करुन तिला धमकी देऊन पळून गेला. अत्याचारी नराधमाच्या धमकीला घाबरून पीडित अल्पवीयन मुलगी भयभीत झाल्याने तिच्यासोबत घडलेला प्रकार तिने कोणाही सांगितला नव्हता.

दरम्यान, पीडित अल्पवीयन मुलीच्या पोटात त्रास होत असल्याने तिला उल्हासनगर मधील शासकीय मध्यवर्ती रुग्णालयात १९ जुलै रोजी उपचारासाठी दाखल करण्यात आले असता हा धक्कादायक प्रकार समोर आला. त्यानंतर पीडित मुलीच्या २९ वर्षीय आईच्या तक्रारीवरून २० जुलै रोजी भादंवि कलम ३७६, (अ ,ब ) सह पोक्सो कायद्यानुसार गुन्हा दाखल करत पोलिसांनी फरार नराधमाचा शोध सुरू केला. या संदर्भात वरिष्ठ पोलीस निरीक्षक शुभदा शितोळे यांच्याशी संपर्क साधला असता पीडित मुलीच्या आईच्या तक्रारीवरून अज्ञात आरोपी विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस पथक त्याचा शोध घेत असल्याचे सांगितले. खळबळजळ बाब म्हणजे गुन्हा दाखल होऊन १० दिवस उलटून गेले आहेत, तरीही अज्ञात नराधमाचा शोध लागत नसल्याने पोलिसांच्या तपासावर प्रश्न उपस्थित होत आहे.

# महाराष्ट्रासाठी सर्वात मोठी खूशखबर, राज्यात ७ मोठ्या गुंतवणूक प्रकल्पांना मान्यता, २० हजार रोजगार निर्मिती होणार

मुंबई – राज्यात गुंतवणुकदारांचा ओघ वाढत असून ८१ हजार १३७ कोटी रूपये गुंतवणुकीच्या विशाल आणि अतिविशाल अशा सात प्रकल्पांना आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या उद्योग विभागाच्या मंत्रीमंडळ उपसमितीत मंजुरी देण्यात आली. यामध्ये उच्च तंत्रज्ञानावर आधारित लिथियम बॅटरी, इलेक्ट्रील व्हेईकल, सेमीकंडक्टर चिप, फळांचा पल्प निर्मिती प्रकल्पांचा समावेश असून कोकणसह मराठवाडा, विदर्भ या भागात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक होणार आहे. त्यामुळे राज्यात सुमारे २० हजार जणांना प्रत्यक्ष रोजगार उपलब्ध होणार आहे. मुंबईत 'सह्याद्री' अतिथीगृह येथे झालेल्या या बैठकीस उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, उद्योग मंत्री उदय सामंत, मुख्य सचिव सुजाता सौनिक, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव आय. एस. चहल, प्रधान सचिव विकास खारगे, उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे आदी उपस्थित होते. राज्यात उद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी औद्योगिक धोरणानुसार सामूहीक प्रोत्साहन योजनेतंर्गत विविध प्रोत्साहने जाहीर करण्यात आलेली आहेत. आजच्या बैठकीत उच्च तंत्रज्ञानावर आधारित लिथियम आयन सेल/बॅटरी, इलेक्ट्रील व्हेईकल, सेमीकंडक्टर चिप्स, सोलर पीव्ही मॉड्युल्स आणि इलेक्ट्रोलायझर, फळाचा पल्प आणि रस यावर आधारित उत्पादन प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली.

### याप्रकल्पांची माहिती अशी:

- जेएसडब्ल्यु एनर्जी पीएसपी इलेव्हन लि., यांचा लिथियम बॅटरी निर्मितीचा अतिविशाल प्रकल्पासाठी गुंतवणुक. हा प्रकल्प नागपूर भागात होणार आहे. प्रकल्पामध्ये एकूण २५ हजार कोटी एवढी गुंतवणूक होणार आहे. ५००० पेक्षा अधिक रोजगारनिर्मिती होणार आहे.
- जेएसडब्ल्यु ग्रीन मोबिलीटी लि. कंपनी इलेक्ट्रीक आणि हायब्रीड वाहन निर्मितीचा मोठ्या प्रमाणात गुंतवणूक होणारा राज्यातील पहिलाच अतिविशाल प्रकल्प आहे. हा प्रकल्प छत्रपती संभाजीनगर येथे होणार आहे. या प्रकल्पामध्ये एकूण २७ हजार २०० कोटी एवढी गुंतवणूक होणार असून, ५२०० पेक्षा अधिक रोजगार निर्मिती होणार आहे. या प्रकल्पामध्ये वार्षिक ५ लाख इलेक्ट्रीक प्रवासी कार व १ लाख व्यावसायिक कार निर्मितीचे नियोजन आहे.

**काल झालेल्या मंत्रीमंडळातील निर्णय**

## ठाणे पालिकेच्या विविध उपक्रमांसाठी शासकीय जमीन, कन्व्हेंशन सेंटर, पक्षी गृह उभारणार

मुंबई – ठाणे पालिकेच्या विविध उपक्रमांसाठी लोकोपयोगी कारणांसाठी शासकीय जमीन विनामुल्य देण्याचा निर्णय काल झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

ठाणे महानगरपालिकेस मौ.वडवली येथे २-३५-७६ हेक्टर आर ही जमीन कन्व्हेंशन सेंटर विकसित करण्यासाठी हस्तांतरित करण्याचा निर्णय झाला. तरुण आणि युवा पिढीस रोजगार निर्मिती आणि कौशल्य विकासासाठी या केंद्राचा उपयोग होईल. त्याचप्रमाणे महानगरपालिकेस मौ. कोलशेत तसेच मौ. कावेसर येथील एकूण ५-६८ हेक्टर आर ही शासकीय जमीन विनामुल्य देण्याचा निर्णयही घेण्यात आला. या ठिकाणी पक्षीगृह (एव्हीअरी सेंटर) विकसित करण्यात येईल. पक्षांकरिता नैसर्गिक अधिवास निर्माण करणे आणि पक्षांच्या जीवनमानाबद्दल नागरिकांत जागरुकता निर्माण करण्यासाठी हे केंद्र काम करेल. मौ. कावेसर येथील २-२०-४३ हेक्टर आर ही शासकीय जमीन रामकृष्ठ मठ आणि रामकृष्ण मिशन या संस्थेस अध्यात्मिक, सामाजिक, आरोग्य, शिक्षण, महिला सबलीकरण व लोकोपयोगी कारणासाठी देण्याचा निर्णय झाला. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ चे कलम ४० व सरकारी जमिनीची विल्हेवाट करणे नियम १९७१ चे नियम ५० नुसार आणि २५ जुलै २०१९ च्या शासन निर्णयानुसार थेट जाहीर लिलावाशिवाय १ रुपये प्रती चौरस मिटर या नाममात्र दराने ही जमीन देण्यात येईल.

**सखल भागात अतिवृष्टी व भरती प्रसंगी साचणाऱ्या पावसाळी पाण्याचा प्रश्न**

## पावसाळी पाण्याचा प्रश्न निकाली काढण्यासाठी आयआयटी तज्ज्ञांमार्फत पाहणी



नवी मुंबई : २१ जुलै २०२४ रोजी नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात दुपारी अतिवृष्टी आणि उधाण भरती यांचा कालावधी जुळून आल्याने शहरातील काही सखल भागात पाणी साचल्याचे निदर्शनास आले होते. या दिवशी सरासारी १३९.७३ मिमी इतक्या मोठ्या प्रमाणात पर्जन्यवृष्टीची नोंद झाली. या पार्श्वभूमीवर महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी विविध ठिकाणांना भेटी देत प्रत्यक्ष पाहणी केली होती व आपत्कालीन मदतकार्याला गती दिली होती.

तसेच दुसऱ्या दिवशी अतिरिक्त आयुक्त श्री. सुनिल पवार, अतिरिक्त आयुक्त तथा शहर अभियंता श्री. शिरीष आरदवाड व अतिरिक्त शहर अभियंता श्री. अरविंद शिंदे यांनी आयुक्त महोदयांच्या निर्देशानुसार स्थलदर्शक पाहणी केली होती. या दरम्यान त्यांनी नागरिकांशी संवाद साधत परिसरातील नाले व होल्डींग पाँड यांना भेटी देत पाणी साचण्याची कारणमिमांसा जाणून घेतली होती.

तथापि इतक्या वर्षात या होल्डींग पाँडमध्ये मोठया प्रमाणात गाळ जमा होऊन खारफुटींचीही वाढ झाल्याने होल्डींग पाँडची पाणी धारण क्षमता कमी झाल्याने भरतीच्या वेळी मोठया प्रमाणात पाऊस झाल्यास होल्डींग पाँड मध्ये पावसाचे पाणी सामावून घेण्यासाठी जागा नसल्याने ते पाणी शहरातील सखल भागात साचत असल्याचे निदर्शनास येत आहे. यावर उपाय म्हणजे सदर होल्डींग पाँड गाळ काढून स्वच्छ करणे हा असून त्यासाठी नवी मुंबई महानगरपालिकेस आवश्यक परवानगी मिळणेसाठी सातत्याने प्रयत्न व पाठपुरावा करण्यात येत आहे. ही बाब सर्वोच्च न्यायालय मुंबई यांच्या पटलावर आहे.

ही वस्तुस्थिती विचारात घेता या विषयी आवश्यक उपाययोजना करण्याच्या दृष्टीने आयुक्तांच्या निर्देशानुसार अतिरिक्त आयुक्त तथा शहर अभियंता श्री. शिरीष आरदवाड यांचेमार्फत पर्यावरण विभागाचे प्रमुख म्हणून आयआयटी मधील तज्ज्ञांसोबत विशेष बैठक आयोजित करण्यात आली. यावेळी आयआयटी मुंबईचे प्रा. व्ही. ज्योती प्रकाश आणि आर.एस.जांगीड यांच्याशी सविस्तर चर्चा करण्यात आली.

या अनुषंगाने सन २००५ मधील होल्डींग पाँडची स्थिती तसेच इतक्या वर्षातील पर्जन्यवृष्टीचे प्रमाण यांचीही तपासणी करण्यात येणार असून आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली नमुंमपा क्षेत्रातील नैसर्गिक नाले व होल्डींग पाँडचे नुतनीकरण करणेकरिता विशेष समिती गठीत करण्यात येत आहे. समितीमध्ये आयआयटीच्या या दोन तज्ज्ञांसह सिडकोचे विद्यमान मुख्य नियोजनकार रविंद्रकुमार मानकर हे समिती सदस्य असणार आहेत. तसेच महानगरपालिकेमार्फत सिडकोचे निवृत्त नियोजनकार श्री. रवीकुमार यांचाही समितीत सदस्य म्हणून समावेश असणार आहे. सिडकोमार्फत शहर वसविताना पावसाळी पाण्याच्या नियोजनाच्या दृष्टीने होल्डींग पाँडची रचना करण्यात आल्याने या दोन्ही तज्ज्ञ अधिकाऱ्यांच्या अनुभवाचा उपयोग होणार आहे.

विशेषत्वाने शहरातील सखल भागातील नागरिकांना पावसाळी कालावधीत भरतीची वेळ आणि अतिवृष्टी प्रसंगी पाणी साचून होणारा हा त्रास दूर करण्यासाठी होल्डींग पाँड सफाई करण्याची परवानगी मिळण्याबाबत आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यावरण व स्थापत्य विभागामार्फत गतीमान कार्यवाही करण्यात येत असून आयआयटीच्या तज्ज्ञांमार्फत प्रत्यक्ष पाहणी करुन प्राप्त होणारा अहवाल परवानगीसाठी महत्वाचा ठरणार आहे.

# संपादकीय...



संपादक–चंद्रकांत भोईटे

## पोलिसांचे कौतुकास्पद प्रयत्न

जादुटोणा कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी राज्यातील प्रत्येक पोलीस ठाण्यात अंधश्रद्धा निर्मूलन कक्ष स्थापन करावा, असा आदेश पोलीस महासंचालक कार्यालयाने जारी केला आहे. विशेष पोलीस महानिरीक्षक (कायदा व सुव्यवस्था) छेरिंग दोरजे यांनी संबंधित आदेश राज्यातील सर्व पोलीस आयुक्त व पोलीस अधीक्षक कार्यालयांना पाठवले आहेत. राज्यात अंधश्रद्धा , जादूटोणा विरोधी कायदा लागू आहे. त्यामुळे राज्यातील अंधश्रद्धा बंद व्हावी या हेतूने सरकार व पोलीस प्रशासन प्रयत्न करीत आहेत, ही कौतुकास्पद बाब आहे. महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष अनिष्ट व अघोरी प्रथा, जादुटोणा यांना प्रतिबंध करण्याबाबत व त्याचे समूळ उच्चाटन करण्याबाबत अधिनियम २०१३ च्या कलम ५ (१) अन्वये संबंधित आदेश जारी करण्यात आला आहे. त्यानुसार, राज्यातील सर्व पोलीस आयुक्तांच्या कार्यक्षेत्रात सहाय्यक आयुक्त (गुन्हे), तसेच पोलीस अधीक्षकांच्या कार्यक्षेत्रात पोलीस निरीक्षक (स्थानिक गुन्हे शाखा) यांची दक्षता अधिकारी म्हणून नियुक्ती करावी, तसेच महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा यांना प्रतिबंध घालण्याबाबत अधिनियम २०१३ च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी प्रत्येक पोलीस ठाण्यात एक कक्ष स्थापन करण्याच्या सूचना करण्यात आल्या आहेत. यामुळे राज्यातील घडणाऱ्या अपप्रकारांवर अंकुश ठेवण्यात येईल.पोलीस महासंचालक कार्यालयाकडून हे आदेश सर्व पोलीस आयुक्त, सर्व जिल्हा पोलीस अधीक्षक यांना पाठवले आहेत. त्यामुळे जादुटोणा कायद्याअंतर्गत प्रकरण हाताळण्यासाठी एक स्वतंत्र कक्ष स्थापन करण्यात येणार आहे. तसेच तक्रारीची अंमलबजावणी व गुन्ह्याचा तपास याबाबत तक्रारदाराला दक्षता अधिकाऱ्याकडे दाद मागता येणार आहे. १९ जुलै रोजी विशेष पोलीस महानिरीक्षक (कायदा व सुव्यवस्था) छेरिंग दोरजे यांनी याबाबतचे आदेश जारी केले आहेत. आदेश मिळाल्यानंतर संबंधित कार्यवाहीला सुरुवात करण्याबाबत आदेशात नमुद करण्यात आले आहे. खरेतर महाराष्ट्रात पुरोगामी विचारांचे थोर समाजसेवक होऊन गेले. महात्मा फुले, संत गाडगेबाबा यांनी लोकांमधील अंधश्रद्धा व जुन्या रूढी, जाचक परंपरा नष्ट करण्यासाठी आपले जीवन वेचले. दिवंगत नरेंद्र दाभोळकर यांनी अंधश्रद्धा व जादूटोणा या परंपरांना नष्ट करण्यासाठी आपल्या आयुष्याचे योगदान दिले. राज्यात सुसंस्कृत, नैतिक, समतावादी विचारांचा प्रचार व्हावा, यासाठी दाभोळकरांची अंधश्रद्धा निर्मूलन समिती हिरीरीने लढत राहिली. दाभोळकरांच्या प्रयत्नांमुळे तत्कालीन सरकारला अंधश्रद्धा, जादूटोणा विरोधी कायदा करावा लागला. परंतु काही धर्म पाखंडीना हे पटले नाही. दाभोळकर यांची हत्या झाली. व्यक्तीची हत्या झाली म्हणून विचारांची हत्या करता येत नाही. अंधश्रद्धा व जादूटोणा कायद्याचा पाखंडी लोकांना धाक आहे म्हणून लोकांची फसवणूक, नरबळीसारखे प्रकार थांबले आहेत. राज्यात अंधश्रद्धा व जादूटोणा विरोधी कायदा करण्यात आला आहे. परंतु काही राज्यांत तेथील सरकारांची तो कायदा लागू करण्याची इच्छाशक्ती नाही असे दिसते. त्यामुळे इअटर राज्यांत नरबळी, बाबाबुवांचे दरबार जोरात सुरू आहेत. काही दिवसांपूर्वी उत्तरप्रदेशात हाथरसजवळ एका तथाकथित बाबाच्या कार्यक्रमात चेंगरून १०१ लोकांचा बाली गेला. त्या बाबाच्या पायाची धूळ मस्तकी लावण्यासाठी चेंगचेंगरी झाली , त्यात ही दुर्घटना घडली. सादर बाबांवर उत्तरप्रदेश सरकार योग्य पद्धतीने गुन्हा दाखल करू शकत नाहीत. कारण तिथे अंधश्रद्धा, जादूटोणा विरोधी कायदा अस्तित्वात नाही. त्यामुळे या कायद्याचे महत्व अधोरेखित होते. तसेच जनमानसात तथाकथित बाबाबुवांच्या फसवणुकीविरोधात सरकार व पोलीस प्रशासन काहीच करू शकत नाहीत. म्हणून राज्यात सुरू असलेल्या पोलीस प्रशासनाचे प्रयत्न कौतुकास्पद वाटतात.

# यशश्री–दाऊदची जुनी ओळख, पण ३–४ वर्षात भेटले नव्हते, भेटल्यानंतर वादातून हत्या, पोलिसांनी घटनाक्रम सांगितला!

**मुंबई : उरण येथील २२ वर्षीय तरूणी यशश्री शिंदेची निघृण हत्या करण्यात आली. यशश्रीची हत्या झाल्यापासून मुख्य आरोपी दाऊद शेख फरार होता. अखेर दाऊदला कर्नाटकातून ताब्यात घेण्यात आले आहे. यानंतर पोलिसांनी नवी मुंबईत प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना यशश्री शिंदे हिच्या हत्येचा घटनाक्रम सांगितला आहे.** अतिरिक्त पोलीस आयुक्त दीपक साकोरे यांनी सांगितले की, आज गुन्हा दाखल होवून पाच दिवस झाले आहेत. या प्रकरणात नातेवाईक, मित्र, अशा तीन चार जणांवर संशय होता. मुख्य आरोपी दाऊद शेखचा शोध घेण्यासाठी पोलीस पथक कर्नाटक येथे गेले होते. काल सकाळी दाऊद शेखला कर्नाटकमधून अटक करण्यात आली.



### यशश्री–दाऊदची जुनी ओळख, पण...

आरोपी दाऊद शेखचे लोकेशन मिळत नव्हते. दाऊदच्या लोकेशनची माहिती त्याच्या मित्राकडून माहिती दिली. मिळालेल्या माहितीनुसार अलर गावातून दाऊदला जेरबंद करण्यात आले. आरोपीने हत्या कबूली दिली आहे. मयत आणि आरोपीमध्ये यांच्यामध्ये आधीपासून मैत्री होती. मागील तीन ते चार वर्षात मयत यशश्री शिंदे आरोपी दाऊद शेखच्या संपर्कात नव्हती, अशी माहिती पोलिसांनी दिली आहे.

### भेटल्यानंतर वादातून हत्या

पोस्टमोर्टममध्ये डॉक्टरांनी सांगितले आहे की, मयत मुलीचा चेहरा कुत्र्यांनी विद्रुप केल्याची शक्यता आहे. या प्रकरणात किडनॅप करून मारलेले नाही. मुलीला आरोपीने बोलावून घेतले होते. दोघेही अनेक वर्षापासून उरणमध्ये राहतात. त्यांची एकमेकांची जुनी ओळख आहे. एकत्र शाळेत होते का? याची माहिती घेतली जात आहे. दोघे एकत्र भेटणार होते. मुलगी भेटल्यावर कदाचित वाद झाला असावा, यातून हत्या केल्याची माहिती समोर येत आहे. मात्र अजून चौकशी बाकी आहे, अशीही माहिती पोलिसांनी दिली आहे.

### आरोपीच्या मित्राकडून मिळाली माहिती

दाऊदचा मित्र मोसीम हा मयत यशश्री शिंदे हिच्या संपर्कात होता. पण त्यानेच आरोपीला अटक करण्यात मदत केली आहे. सध्या तरी या प्रकरणात एकच आरोपी असल्याचे समोर येत आहे. यामध्ये अजून चौकशी सुरु आहे. उरणमध्ये राहणारा आरोपी दाऊद करोना काळात कर्नाटकमध्ये गेला होता. तिथे तो ड्रायव्हर म्हणून काम करत होता. त्याचा मोबाईल अद्याप सापडला नाही. आरोपीला इकडे आणल्यानंतर मोबाईल ताब्यात घेऊ, असे उरण पोलिसांनी म्हटले आहे.

## नको असलेल्या चार वर्षीय मुलाची हत्या करणाऱ्या पित्याला अटक

ठाणे – आपल्या पोटच्या चार वर्षीय मुलाची गळा आवळून हत्या करणाऱ्या नराधम मोहम्मद दिलशान इम्रान या सावत्र बापाने गळा आवळून मारहाण करीत हत्या केल्याची धक्कादायक घटना मानपाडा येथील एमएमआरडीएच्या दोस्ती इमारतीत घडली. आर्यन असे मृत मुलाचे नाव असून या प्रकरणी चितळसर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून आरोपी सावत्र पित्याला अटक करण्यात आली आहे. अशी माहिती परिमंडळ ५ चे पोलीस उपायुक्त अमरसिंग जाधव यांनी मंगळवारी दिली.

घोडबंदर रोड परिसरातील दोस्ती एम्पेरियाजवळ असणाऱ्या एमएमआरडीए इमरतीमध्ये राहणाऱ्या २३ वर्षीय दिलशान इम्रान याने रेश्मा नावाच्या महिलेबरोबर लग्न केले होते. रेश्माचे हे दुसरे लग्न होते. तिला पहिल्या पतीपासून आर्यन नावाचा चार वर्षांचा मुलगा असल्याचे तिने दिलशान पासून लपवले होते. कालांतराने रेश्मा आर्यनला घेऊन दिलशान आणि ती राहत असलेल्या घरी आली. मात्र या घटनेचा दिलशान याला प्रचंड राग आला. त्यामुळे तो आर्यनचा राग राग करू लागला. याच रागातून त्याने २८ जुलै रोजी सायंकाळी ७:३० वाजण्याचा सुमारास आर्यनचा गळा आवळून त्याला लोखंडी सोफ्यावर आपटले. यामध्ये दुखापत होऊन आर्यनचा मृत्यू ओढवला.

## उपवनच्या तलावात १९ वर्षे तरुण बुडाला सुदैवाने वाचला

ठाणे : होण्यासाठी गेलेल्या मात्र पाण्याचा अंदाज न आल्याने ग्रुप बाहेर काढून त्याला उपचार करिता रुग्णालयात दाखल करण्यात आल्याची माहिती आणि आपत्ती व्यवस्थापन विभागाने दिली सदरची घटना मंगळवारी (ता–३० जुलै) रोजी संध्याकाळी पाच वाजता सुमारास घडली. पाण्याचा अंदाज न आल्याने बुडण्याची घटना पंधरा दिवसातील दुसरी घटना आहे. मंगळवारी खाण्याच्या उपवन तलावात होण्यासाठी गेलेला १९ वर्षीय तरुण करण सिंग (१९) रा. बिल्डींग नंबर २, मानपाडा पोलीस स्टेशन मागे, मानपाडा हा तलावात पोहत असताना त्याला पाण्याच्या खोलीची अंदाज आला नाही. आणि करण बुडाला. घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी वर्तक नगर पोलीस पोहोचले आणि बुडालेल्या करणला सुखरूपपणे बाहेर काढण्यात यश मिळवले व त्याला त्वरित ठाण्याच्या सिविल रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. घटनास्थळी वर्तकनगर पोलीस स्थानकाचे पोलीस अधिकारी व कर्मचारी, आपत्ती व्यवस्थापन विभागाचे कर्मचारी वाहनासह, आपत्ती प्रतिसाद दलाचे जवान व अग्निशमन दलाचे जवान फायर वाहनासह उपस्थित झाले.

## राबोडीत संरक्षण भिंत कोसळली.. जीवित हानी नाही

ठाणे – ठाण्याच्या राबोडी परिसरातील श्रीरंग सोसायटीच्या इमारत क्रमांक:– सी.डी./४४ या इमारतीची संरक्षण भिंत कोसळण्याची घटना मंगळवारी(ता–३० जुलै) रोजी दुपारी १ वाजण्याच्या सुमारास घडली. या घटनेत कुणालाही दुखापत झालेली नाही.

मंगळवारी दुपारी १ वाजण्याच्या सुमारास अचानक श्रीरंग सोसायटीमधील इमारत क्रमांक:– सी.डी./४४ या इमारतीची संरक्षण भिंत १५ फूट लांब व ०५ फूट उंच असलेली भिंत ही संरक्षण भिंत फुटपाथवरती पडली. घटनेची माहिती मिळताच आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी, यांनी सुरक्षेच्या दृष्टीने भिंत पडलेल्या ठिकाणी आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी यांचे मार्फत धोकापट्टी बांधण्यात आली.

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
ठाणे विभाग, ठाणे
वेस्ट व्हयू, तिसरा मजला,
राम मारुती रोड,
ठाणे (प.) ४००६०१.

**चौकशीची जाहीर नोटीस**

अर्ज क्रमांक :– **ध उ आ /९७२ /२०२४ M.A.१२४/२४**
सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक :– विद्या विकास मंडळ
न्यास नोंदणी क्र. एफ/१२९/ठाणे

अर्जदार :– श्री. सगुण कृ आडारकर

सर्व संबंधित लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मा. धर्मादाय उपायुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, ठाणे विभाग, ठाणे हे वर नमूद केलेल्या फेरफार अर्जासंबंधी, महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० चे कलम २२ प्रमाणे चौकशी करणार आहेत. अर्जदार यांनी फेरफार अर्जामध्ये नमूद केले आहे, **खालील विश्वस्तांना कार्यकारी मंडळातून / विश्वस्त मंडळातून कमी करण्यात आले आहे.**

१) श्री. मधुकर श्रावण बाणी   २) श्रीमती. राधिका मनीष वायंगणकर

तसेच खालील नमूद विश्वस्तांचा विश्वस्त म्हणून कार्यकारी मंडळात समावेश करण्यात आला आहे.

१) श्रीमती. राधिका मनीष वायंगणकर   २) श्रीमती. अनघा स्वानंद चक्रदेव

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी याची लेखी कैफियत, ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पूर्ण केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा. सहायक धर्मादाय आयुक्त, ठाणे विभाग ठाणे यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक ३०/०७/२०२४ रोजी दिली.

शिक्का

सही/–
अधिक्षक (न्याय शाखा)
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
ठाणे विभाग, ठाणे.

Public Trusts Registration Office, Thane
Address: 1st Floor,Lilly Apt, Parsi Agari Lane
Tembi Naka Thane (w)- 400601

**Public Notice**

Service Request Number : THN/12573/18/24
Inquiry/case No. : ACC/I/759/2024

Name of the Trust : **श्री. सुमतिनाथ मानसरोवर जैन संघ चॅरिटेबल ट्रस्ट**

**Address of the Trust : मानसरोवर सेल्स ऑफिस, एस. क्र. ३९४/ए/१, मानसरोवर बिल्डींग, टीएमसी ऑफिस पंचपाखडीच्या समोर, ठाणे (वेस्ट), ठाणे, ठाणे, ठाणे**

**Name of the Applicant : अनिल नागराज मुथा.**

To
**All Concerned having interest**
Whereas in the above application under section 19 of the Maharashtra Public Trust Act 1950, an enquiry is to be made under section 19 of the said Act, on the following points by the Asst. Charity Commissioner, Thane.

1. Whether a Trust in the respect of the above exists and whether such Trust is a public Trust?
2. Whether any of the following properties are the properties of such Trust?

**Movable Property**

| SR | Property Details | Estimated Value |
|---|---|---|
| 1 | Cash In Hand | 11000.00 |

**Value of Movable Property :** Rs. 11000/- Only
(In Words Rs. Eleven Thousand Only)

**Immovable Property**

| SR NO | Town Or Village | CS Or Municipal Or Survey No | Area | Assessment Or Judiciary | Tenure Or Nature | Estimated Value |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Nil | Nil | Nil | Nil | Nil | 0.00 |

Value of Immovable Property : Rs. 0/- Only
(In Words Rs. Only)

This is to call upon you to submit your objections or any evidences if any, at the above office address within 30 days from the date of publication of this notice in written. If not received anything within given period, the inquiry would be completed & necessary orders will be passed. If no objections are received within the stipulated time then further inquiry would be completed and necessary orders will be passed.

This notice given under my hand and seal of the Office on this date 30/07/2024.

Stamp

Sign/-
Superintendent
Public Trusts registration Office,
Thane

Public Trusts Registration Office, Thane
Address: 1st Floor,Lilly Apt, Parsi Agari Lane
Tembi Naka Thane (w)- 400601

**Public Notice**

Service Request Number : THN/00075/18/24
Inquiry/case No. : ACC/III/30/2024

Name of the Trust : MAA SARADA SANATAN FOUNDATION

**Address of the Trust :** BELOW WATER TANK, DHOBIGHAT, ULHASNAGAR THANE, THANE, THANE

**Name of the Applicant :** MR. AJAY RAMAKANT PANDEY

To
**All Concerned having interest**
Whereas in the above application under section 19 of the Maharashtra Public Trust Act 1950, an enquiry is to be made under section 19 of the said Act, on the following points by the Asst. Charity Commissioner, Thane.

1. Whether a Trust in the respect of the above exists and whether such Trust is a public Trust?
2. Whether any of the following properties are the properties of such Trust?

**Movable Property**

| SR | Property Details | Estimated Value |
|---|---|---|
| 1 | Cash In Hand | 1000.00 |

**Value of Movable Property :** Rs. 1000/- Only
(In Words Rs. One Thousand Only)

**Immovable Property**

| SR NO | Town Or Village | CS Or Municipal Or Survey No | Area | Assessment Or Judiciary | Tenure Or Nature | Estimated Value |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Nil | Nil | Nil | Nil | Nil | 0.00 |

Value of Immovable Property : Rs. 0/- Only
(In Words Rs. Only)

This is to call upon you to submit your objections or any evidences if any, at the above office address within 30 days from the date of publication of this notice in written. If not received anything within given period, the inquiry would be completed & necessary orders will be passed. If no objections are received within the stipulated time then further inquiry would be completed and necessary orders will be passed.

This notice given under my hand and seal of the Office on this date 25/07/2024.

Stamp

Sign/-
Superintendent
Public Trusts registration Office,
Thane

## देवेंद्र फडणवीस भाजपाचे नवे राष्ट्रीय अध्यक्ष?

**(पान १ वरून)** लोकसभा निवडणुकीत राज्यात भाजपाला अपेक्षित विजय मिळाला नाही म्हणून फडणवीस यांनी सत्ताकेंद्रातून बाहेर पडून पक्षाचे काम करण्याची मागणी केली होती. यावेळी फडणवीस यांना राज्याचे प्रदेशाध्यक्ष पद मिळण्याची अपेक्षा होती. परंतू, केंद्रीय नेतृत्वाने एवढ्यात सत्ता सोडण्याची गरज नसल्याचे समजावत फडणवीस यांना त्यांची भुमिका मागे घेण्यास लावली होती. भाजप अध्यक्ष पदासाठी फडणवीसांचे नाव चर्चेत असल्याची बातमी दी न्यू इंडियन एक्स्प्रेसने दिली आहे.

**फडणवीस का?** – फडणवीस यांनी यापूर्वीही पक्ष संघटनेचे काम केले आहे. मुख्यमंत्री, ते राज्यातील गेलेली सत्ता परत आणणे यामध्ये फडणवीस यांनी खेळलेल्या चाली यावरून भाजप अध्यक्ष पदासाठी फडणवीस स्पर्धेत असलेल्या सर्व नेत्यांपेक्षा फिट आणि योग्य उमेदवार मानले जात आहेत. याचे आणखी एक कारण म्हणजे फडणवीसांचे शहा आणि मोदींसोबत चांगले संबंध हे देखील मानले जात आहे.

फडणवीसांचे संघचालक मोहन भागवत यांच्याशीही चांगले संबंध आहेत. शिवाय फडणवीस संघाचे मुख्यालय असलेल्या नागपूरचे आहेत. सुत्रांच्या हवाल्याने दिलेल्या या वृत्तात आरएसएस आणि भाजपात अध्यक्ष पदावरून मतभेद होते. एवढ्या महत्वाच्या पदावरील व्यक्ती ही आरएसएसच्या जवळचीही हवी असे संघाला वाचत होते. नड्डा यांनी जरी भाजप आता स्वतंत्र असल्याचे म्हटले असले तरी देखील ती आरएसएसच्या नाण्याची एक बाजू आहे.

यामुळे फडणवीस हेच राष्ट्रीय अध्यक्ष बनण्याची शक्यता अधिक असल्याचा दावा करण्यात आला आहे. मतभेदांमुळे अध्यक्ष पदाचे नाव जाहीर करण्यात वेळ लागत होता. फडणवीसांच्या नावावर दोन्ही गट सहमत होताना दिसत आहेत. या पार्श्वभूमीवर मोदी–फडणवीस यांची भेट महत्वाची असल्याचे म्हटले जात आहे.

नागपूर आणि महाराष्ट्रातून यापूर्वी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष राहिलेले आहेत. फडणवीसांनीही पक्ष संघटनेसाठी काम करण्याची इच्छा व्यक्त केली जात होती. यामुळे फडणवीसांना अध्यक्ष केले तर अनेक फायदे भाजप पक्ष श्रेष्ठींना दिसत आहेत.

## तीन सिलेंडर मोफत मिळणार

**(पान १ वरून)** रक्कम थेट लाभ हस्तांतरणाद्वारे बँक खात्यात जमा करण्यात येईल. या योजनेत ग्राहकास एका महिन्यास एकापेक्षा जास्त सिलिंडरसाठी अनुदान देण्यात येणार नाही. दि.१ जुलै २०२४ रोजी पात्र होणाऱ्या लाभार्थ्यांनाच योजनेचा लाभ देण्यात येईल. दि.१ जुलै २०२४ नंतर विभक्त केलेल्या शिधापत्रिका या योजनेस पात्र ठरणार नाहीत.

या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणी व लाभार्थी निवडीसाठी मुंबई – ठाणे शिधावाटप क्षेत्रासाठी एक प्रत्येक जिल्ह्यासाठी जिल्हास्तरीय समित्यांची स्थापना करण्यात आली आहे. मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे शहरासाठी नियंत्रक, शिधावाटप आणि संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली समिती असेल. तर संबंधित जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समिती कार्यरत असेल. या दोन्ही समिती मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांचे (रेशन कार्डनुसार) कुटुंब निश्चित करेल. योजनेतील लाभार्थ्यांची द्विरुक्ती होणार नाही याची काळजी घेईल. निकषांची पूर्तता करणाऱ्या लाभार्थ्यांची आधार प्रमाणित अंतिम यादी, आधार संलग्न बँकखाते क्रमांकासह निश्चित करेल. याशिवाय योजनेच्या प्रभावी अंमलबजावणी व ग्राहकांच्या तक्रारीचे निराकरण करण्यासाठी राज्यस्तरीय समितीही कार्यरत असणार आहे.

**ठाणे महानगरपालिका, ठाणे**

मुख्य लेखा व वित्त विभाग
मुदत ठेवी ठेवणेसाठी व्याजदर मागविणेबाबत

ठाणे महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण, परिभाषित निधी, भविष्य निर्वाह निधी, शिक्षण विभाग – परिभाषित निधी, शिक्षण विभाग – भ.नि.नि व ठामपा EMD/SD या खात्यामधील रक्कमेची गुंतवणूक करणेसाठी ठाणे महापालिका क्षेत्रातील फक्त राष्ट्रियकृत बँकांकडून व्याजदर मागविणेत येत आहेत. तरी, ठाणे महापालिका क्षेत्रातील राष्ट्रियकृत बँकांनी व्याजदर, ग्राहय दिनांक इ, माहिती ठाणे महानगरपालिकेच्या संकेतस्थळावरील तक्त्यानुसार माहिती व व्याजदर नमूद करुन cafoinvest@thanecity.gov.in या email वर अथवा मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचे नावे मुख्य लेखा विभाग दुसरा मजला, ठाणे महापालिका मुख्यालय, पाचपाखाडी ठाणे येथे दि.०१/०८/**२०२४** रोजी पर्यंत स्वतंत्र पत्र देऊन व्याजदर देण्यात यावेत, तदनंतर प्राप्त व्याजदराच्या पत्राचा विचार करण्यांत येणार नाही.अधिक माहिती www.thanecity.gov.in येथे उपलब्ध आहे.

ठामपा/पिआरओ/लेवविवि/२२१/२०२४-२५   सही/-
दि:३०.०७.२०२४   उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी
ठाणे महानगरपालिका,ठाणे

**Pls visit our oficial web-site**
**www.thanecity.gov.in**

**BHIWANDI NIZAMPUR CITY MUNICIPAL CORPORATION**
**BHIWANDI (Dist. Thane)**
**MAHARASHTRA**
OLD S.T. STAND. KAP-ALI,
BHIWANDI - 421 302, DIST. THANE

**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी, जि.ठाणे, महाराष्ट्र,**
जुना एस.टी.स्टॅण्ड, कापआळी
भिवंडी – ४२१ ३०२, जि. ठाणे

TEL : 02522- 55314/55315, FAX : 02522-25074

जा.क्र. /ज.सं.वि/८७५
दि. ३०/०७/२०२४

**पाणी पुरवठा विभाग**
**ई–निविदा सुचना क्रमांक – ०७ (पहिल्यांदा प्रसिध्दी) सन २०२४–२५**

खालील काम करण्याकरीता सक्षम व अनुभवी ठेकेदारांकडून ई निविदा मागविण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे स्वरूप अंदाजित खर्च निविदा फॉर्म फी | निविदा विक्री व स्विकारण्याची अंतिम दिनांक |
|---|---|---|
| १. | प्रभाग समिती क्र. २ च्या कार्यक्षेत्रातील महानगरपालिकेच्या शाळांना पाणी पुरवठा करणे कामी जलवाहिनी अंथरणे व पिण्याच्या पाण्याकरीता वॉटर प्युरिफायर बसविणे बाबत. सन २०२४–२५ या. रु. ७४२५४३/– रु. २३६०/– | दि. ०१/०८/२०२४ ते दि. ०८/०८/२०२४ |
| | सदर निविदा बाबतची माहिती मनपा संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in वर दिनांक ०१/०८/२०२४ पासून उपलब्ध आहे. | |

सही/–
कार्यकारी अभियंता,
पाणी पुरवठा विभाग
भिवंडी नि. शहर महानगरपालिका भिवंडी.

**ठाणे महानगरपालिका, ठाणे**

शिक्षण विभाग
अनधिकृत शाळांची जाहिर सूचना

ठाणे महानगरपालिका कार्यक्षेत्रात दिनांक ११.०७.२०२४ रोजी एकूण ६९ शाळांची यादी प्रसिध्द करण्यात आली होती. या शाळा व्यतिरिक्त मनपा क्षेत्रात आणखी ०६ अनाधिकृत शाळा आढळून आलेल्या असून त्यामध्ये पालकांनी प्रवेश घेऊ नये. तसेच संबंधित संस्थाचालकांनी तात्काळ अनधिकृत शाळा / वर्ग बंद करावेत. व तसे हमीपत्र ठाणे महानगरपालिका शिक्षण विभागास सादर करावे. तसेच अनधिकृत शाळा तात्काळ बंद न केल्यास नियमानुसार अनधिकृत शाळांवर शिक्षण विभागामार्फत कारवाई करण्यात येईल.

**अनाधिकृत शाळांची यादी सन २०२४-२५**

| अ. क्र. | शाळेचे नाव व यु-डायस क्रमांक | शाळेचा पत्ता | शाळेचे माध्यम |
|---|---|---|---|
| १ | प्रभावती इंग्लिश स्कूल, जय भिम नगर, महात्मा फुलेनगर, कळवा. | अनधिकृत शाळा | इंग्रजी |
| २ | डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यालय, पौंड पाडा कळवा ठाणे. | अनधिकृत शाळा | हिंदी |
| ३ | बुरहानी स्मार्ट चॅम्प, साई सुमन आप साई हॉ. जवळ मुंब्रा. | अनधिकृत शाळा | इंग्रजी |
| ४ | लिटील एंजल्स प्रायमरी स्कूल, D-१ वफा हिल्सअलमास कॉलनी मागे कौसा, मुंब्रा | अनधिकृत शाळा | इंग्रजी |
| ५ | आयेशा इंग्लिश प्रायमरी स्कूल, डायघर गाव कल्याण फाटा | अनधिकृत शाळा | इंग्रजी |
| ६ | द कॅम्पेनियन हायस्कूल, २ रा व ३ रा मजला खलिल मेन्शन , सी विंग मुरानी रेस्टारेट मागे कौसा, मुंब्रा | अनधिकृत शाळा | इंग्रजी |

ठामपा/पिआरओ/शिक्षण/२१७/२०२४-२५   सही/-
दि:३०.०७.२०२४   शिक्षणाधिकारी
ठाणे महानगरपालिका,ठाणे

**pls visit our official web-site**
**www.thanecity.gov.in**

महापालिका आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड़ यांची टिटवाळा येथील

# रुक्मिणी प्लाझा प्रसुतीगृहास भेट

## सदर प्रसुतीगृहास आवश्यक सुविधा पुरविण्याचे दिले निर्देश



कल्याण : महापालिका आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड़ यांनी काल महानगरपालिकेच्या टिटवाळा (पूर्व) येथील रुक्मिणी प्लाझा प्रसूतीगृहास भेट देऊन रुग्णालयाची पाहणी केली, सदर रुग्णालयात देण्यात येणाऱ्या सुविधांचा आढावा घेतला व रुग्णांची विचारपूस केली. त्यावेळी रुग्णालयात मिळणाऱ्या सुविधांबाबत रुग्णांनी समाधान व्यक्त केले.

महानगरपालिकेच्या सर्वसमावेशक आरक्षणाअंतर्गत उपलब्ध झालेल्या इमारतीमध्ये महिलांसाठी प्रसूतीगृह हे जून २०२३ पासून सुरू करण्यात आले आहे. सदर प्रसूतीगृह एकूण ५० बेडचे असून संपूर्ण रुग्णालय बाह्य संस्थेमार्फत मनुष्यबळ उपलब्ध करून चालविण्यात येते. सदर रुग्णालयांमध्ये प्रसूती विषयक सर्व सेवा मोफत उपलब्ध करून देण्यात येतात. या ठिकाणी प्रयोगशाळा सुविधा तसेच सोनोग्राफी सुविधा या सेवा प्रसूतीच्या रुग्णांसाठी मोफत उपलब्ध आहेत.

माहे जून २०२३ पासून अद्यापपर्यंत सदर रुग्णालयामध्ये एकूण १६२४९ महिलांनी बाह्यरुग्ण विभागात तर २२०७ रुग्णांनी आंतररुग्ण सुविधेचा लाभ घेतला आहे. तसेच अद्याप पर्यंत सातशे पाच सामान्य प्रसूती तसेच २११ सिझेरियन द्वारे प्रसुती झालेल्या आहेत तसेच एकूण ४८ रुग्णावर नसबंदी शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत.

महापालिका आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड़ यांनी पाहणी करतेवेळी रुग्णालयाबाहेर दिशादर्शक फलक लावणे, श्रीगणेश मंदिरापासून रुग्णालयापर्यंत पथ दिव्यांची व्यवस्था करणे, महिला रुग्णांच्या सुविधेसाठी रुक्मिणी प्लाझा प्रसुतीगृहापर्यंत चांगला रस्ता बनविणे व त्याचप्रमाणे या रुग्णालयातून प्राप्त होणाऱ्या/झालेल्या सुविधांबाबत अभिप्राय देण्याकरीता क्युआर कोड लावणेबाबत निर्देश दिले.

यावेळी शहर अभियंता अनिता परदेशी, अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड, परिमंडळ-१ चे उपायुक्त प्रसाद बोरकर, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. दिपा शुक्ला, कार्यकारी अभियंता जगदिश कोरे, घन:शाम नवांगुळ, सुरेंद्र टेंगळे, वैद्यकीय अधिकारी डॉ.समिर सरवणकर व इतर अधिकारी वर्ग उपस्थित होता.

# गणित-विज्ञान प्राथमिक शिक्षकांना महिनाभरात पदोन्नती मिळणार



## आमदार निरंजन डावखरे यांच्या प्रयत्नांना यश

ठाणे : ठाणे जिल्हा परिषदेच्या शाळांमधील गणित व विज्ञान विषयातील पदवीधर शिक्षकांना महिनाभरात पदोन्नती मिळेल. या संदर्भात तातडीने सर्व कार्यवाही पूर्ण केली जाईल, असे आश्वासन मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी सोमवारी येथे दिले. या प्रश्नाबाबत आमदार निरंजन डावखरेंकडून केल्या जाणाऱ्या पाठपुराव्याला यश आले आहे.

कोकण पदवीधर मतदारसंघातील आमदार निरंजन डावखरे व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या प्रमुख उपस्थितीत जिल्हा परिषदेच्या कार्यालयात बैठक घेण्यात आली. या बैठकीला शिक्षणाधिकारी बाळासाहेब राक्षे, उपशिक्षणाधिकारी कुंदा पंडित, आशिष झुंझारराव, विज्ञान पदवीधर कृती समितीचे पदाधिकारी उमेश बेंडाळे, मनोहर घरत, मंगेश इसामे, विठ्ठल मराठे, अंकुश माळी, शिवकांत खोडदे आदी उपस्थित होते. या बैठकीत पदोन्नतीसंदर्भातील विविध मुद्द्यांवर महत्वपूर्ण चर्चा झाली. त्यात महिनाभरात पदोन्नतीची प्रक्रिया पूर्ण करण्याचा निर्णय घेण्यात आला.

ठाणे जिल्ह्यातील गणित व विज्ञान विषयाच्या शिक्षकांच्या पदोन्नतीचा प्रश्न तांत्रिक कारणांबरोबर विविध अडचणींमुळे १० वर्षांपासून प्रलंबित होता. जागा रिक्त असूनही शिक्षकांना पदोन्नती मिळत नव्हती. या संदर्भात जिल्हा परिषदेकडे १४८ शिक्षकांच्या पदोन्नतीचा प्रस्ताव प्रलंबित होता. या प्रस्तावाला मंजुरी मिळविण्यासाठी आमदार निरंजन डावखरे यांनी पुढाकार घेतला. काल झालेल्या बैठकीत विज्ञान व गणित पदवीधर शिक्षकांची ३१४ पदे रिक्त असल्याचे स्पष्ट झाले. या पदावर सर्व तांत्रिक मुद्दे सोडवून पदोन्नती देण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार १३० शिक्षकांना पेसा क्षेत्रात पदोन्नती दिली जाणार आहे.

तत्पूर्वी आमदार निरंजन डावखरे यांनी पालघर जिल्हा परिषदेने घेतलेल्या पदोन्नतीच्या निर्णयाकडे लक्ष वेधले. त्यानुसार पदोन्नती मिळाल्यानंतरही त्याच ठिकाणी शिक्षक कार्यरत राहणार आहे. त्याच धर्तीवर ठाणे जिल्ह्यातील विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये, यासाठी प्राथमिक शिक्षकांकडून प्रशासनाला संपूर्ण सहकार्य केले जाईल, अशी ग्वाही आमदार डावखरे यांनी दिली.

आरोग्य महाशिबिर

# डॉक्टरांची बैठक संपन्न

पनवेल : कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त दरवर्षी राबवण्यात येणारे आरोग्य महाशिबिर येत्या ४ ऑगस्ट रोजी आयोजित करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर आमदार प्रशांत ठाकूर आणि डॉक्टरांची बैठक पनवेल येथील सुरूची हॉटेलमध्ये पार पडली. या वेळी महाशिबिराच्या नियोजनासंदर्भात आमदार प्रशांत ठाकूर यांनी मार्गदर्शन केले.

अखंडपणे समाजोपयोगी उपक्रमे राबविणारे श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ, भारतीय जनता पक्ष, रायगड जिल्हा मेडिकल असोसिएशन आणि साधू वासवानी मिशन पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दिनांक ४ ऑगस्ट रोजी विनामूल्य आरोग्य तपासणी आणि मोफत औषधोपचार महाशिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली दरवर्षी हे महाशिबिराचे होत असते. त्या अनुषंगाने यंदाचे १६ वे महाशिबिर आहे. या महाशिबिराच्या अनुषंगाने डॉक्टरांची बैठक पनवेलच्या सुरूची हॉटेलमध्ये झाली.

या बैठकीला भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, सुप्रसिद्ध डॉ. गिरीश गुणे, डॉ. रमेश पटेल, भाजप शहराध्यक्ष अनिल भगत, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, तालुका सरचिटणीस प्रल्हाद केणी, भूपेंद्र पाटील, माजी नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत, कामोठे शहराध्यक्ष रवी जोशी, सांस्कृतिक सेल जिल्हाध्यक्ष अभिषेक पटवर्धन यांच्यासह पदाधिकारी आणि डॉक्टर उपस्थित होते. या वेळी महाशिबिराच्या नियोजनासंदर्भात विचारविनामय करण्यात आला.

नवी मुंबईतील युवकांना आवाहन

# 'मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण' योजनेचा लाभ घ्या

नवी मुंबई : कुशल व रोजगारक्षम महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी मुख्यमंत्रीएकनाथ शिंदे यांनी 'मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना' जाहीर केली आहे. महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या या योजनेव्दारे राज्यातील युवकांना उद्योगांमध्ये प्रत्यक्ष कार्य प्रशिक्षणाव्दारे (इंटर्नशिप) रोजगारक्षम करून उद्योगांकरिता कुशल मनुष्यबळ मिळणार आहे. याकरिता ५५०० कोटी इतक्या निधाची तरतूद करण्यात आलेली आहे.

या योजनेचा लाभ १८ ते ३५ वयोगटातील युवक घेऊ शकणार असून ६ महिने कार्य प्रशिक्षण (इंटर्नशिप) कालावधी असणार आहे. उमेदवारांना प्रशिक्षण कालावधीत विद्यावेतन मिळणार असून १२ वी उत्तीर्णांना रु.६ हजार, आय.टी. आय व पदविका उत्तीर्णांना रु.८ हजार तसेच पदवीधर आणि पदव्युत्तर उत्तीर्ण उमेदवारांना रु.१० हजार दरमहा विद्यावेतन मिळणार आहे.

या योजनेच्या माध्यमातून प्रत्येक आर्थिक वर्षात १० लाख कार्य प्रशिक्षण (इंटर्नशिप) संधी उपलब्ध होणार असून शहरी भागात ५ हजार लोकसंख्येसाठी १ व ग्रामपंचायतीसाठी १ असे एकूण ५० हजार योजनादूत नेमण्यात येत आहेत.

याकरिता शासकीय, निमशासकीय कार्यालये, महामंडळे व विविध क्षेत्रातील प्रकल्प, उद्योग, स्टार्टअप, आस्थापनांनी आवश्यक मनुष्यबळाची मागणी ऑनलाईन नोंदविणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे इच्छुक उमेदवारांनी कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या https://rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन नोंदणी करणे आवश्यक आहे.

याविषयीच्या अधिक माहितीसाठी ठाणे जिल्हाधिकारी कार्यालय आवार, कोर्टनाका, ठाणे (पश्चिम) येथील जुने कोषागार कार्यालयाठिकाणी असलेल्या जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र यांचेशी संपर्क साधता येईल. त्या कार्यालयाचा संपर्क दूरध्वनी क्रमांक ०२२-२५४२८३०० हा आहे.

तरी नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील युवक-युवतींनी या संधीचा मोठ्या प्रमाणात लाभ घ्यावा असे आवाहन नमुंमपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या वतीने करण्यात येत आहे.

# नवी मुंबई पालिकेची अनधिकृत बांधकामांवर कारवाई

नवी मुंबई : नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने अनधिकृत बांधकाम विरोधात मोहीम तीव्र करण्यात आलेली असून नमुंमपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांचे निर्देशानुसार, अतिक्रमण विभागाचे उपआयुक्त डॉ. राहुल गेठे यांच्या नियंत्रणाखाली नेरूळ, कोपरखैरणे, घणसोली, ऐरोली विभागांत ६ बांधकांमावर तोडक कारवाई करण्यात आली.

महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ५४ अन्वये नोटीस देऊनही संबंधितांनी नोटीशीची दखल न घेतल्यामुळे अनधिकृत बांधकामांविरोधात नवी मुंबई महानगरपालिका अतिक्रमण विभागामार्फत कारवाई करण्यात आली. यामध्ये नेरूळ विभागात राजेंद्र रामा भगत व अनिल रामा भगत यांचे घर क्र. २०७/२०८ लोटूस अपा. नेरूळ येथील बांधकाम हटविण्यात आलेले आहे.

तसेच कोपरखैरणे विभागात सेक्टर ४ कोपरखैरणे येथे रूम नं. ९९४ येथील पी.जी.सालेकर यांचे अनधिकृत वाढीव बांधकाम तसेच रूम नं. ९९३ येथे कमलदेव रंगनाथ यादव यांचे अनधिकृत वाढीव बांधकाम निष्कासित करण्यात आले. घणसोली विभागातील गणेश सहदेव सुके यांचे बांधकाम तसेच विजय बहादूर सिंग यांच्या अनधिकृत बांधकामवर कारवाईचा हातोडा पडला.

■ कायदा हातात घ्यावा लागला तरी आम्ही ते करू ■ शिवसेना महिला आघाडीचा युती सरकारला इशारा

# मुख्यमंत्र्यांच्या ठाण्यातच लाडकी बहीण सुरक्षित नाही





ठाणे : गेल्या २ वर्षापासून राज्यासह ठाणे जिल्ह्यात महिलांवरील अत्याचार वाढत आहेत. रस्त्यावर फिरताना महिलांचे जगणे मुश्किल झाले आहे. कावेरी नाखवा, अक्षता म्हात्रे आणि यशश्री शिंदे या महिलांचा नाहक बळी गेल्यानंतरही सरकारला अजून जाग आलेली नाही. एकामागून एक अशा दिवसेंदिवस गुन्हेगारीच्या घटना वाढत चालल्या आहेत. कायद्याचा धाक कोणाला राहिला नाही. त्यामुळे गुन्हेगार आपले राजकीय वजन वापरून पुन्हा मोकाट फिरत आहेत. अशा गुन्हेगारांचा खटला फास्टट्रॅक वर चालून त्यांना फाशीची शिक्षा द्यावी जेणेकरून भविष्यात होणाऱ्या अशा घटनेला आळा बसेल.

मुख्यमंत्र्यांच्या ठाण्यातच लाडकी बहीण सुरक्षित नसून आता कायदा हातात घ्यावा लागला तरी आम्ही ते करू असा थेट इशारा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या महिला आघाडीने दिला. यावेळी महिलांनी युती सरकारच्या विरोधात काळी फीत लावून संताप व्यक्त करीत हल्लाबोल केला.

त्यावेळी महिला जिल्हा संघटक रेखा खोपकर, समिधा मोहिते, मा. नगरसेविका नंदिनी विचारे, अॅड. आकांक्षा राणे, प्रमिला भांगे, वैशाली शिंदे, ज्योती कदम, छाया अमृगम, अनिता प्रभू, वासंती राऊत, सुप्रिया गायकर, अॅड. आरती खळे, अॅड. पूजा भोसले, भारती गायकवाड, सायली साळवी, वंदना पवार व इतर महिला पदाधिकारी उपस्थित होत्या.

## सत्ताधाऱ्यांच्या कुटुंबियांना आणि गुंडांना संरक्षण देण्यात पोलीस व्यस्त : मा. नगरसेविका नंदिनी राजन विचारे

गेल्या २ वर्षात श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या महाराष्ट्र राज्यात सराईत गुन्हेगार मोकाट फिरत आहेत. महिला अ सुरक्षित आहेत. राज्याचे गृहखाते व पोलीस यंत्रणा काय करीत आहेत ? असा सवाल त्यांनी व्यक्त केला आहे. अपुऱ्या पडणाऱ्या पोलीस मनुष्यबळामुळे पोलीस खाते हतबल झाले आहे. प्रामुख्याने ठाण्यातील पोलिसांचा मनुष्यबळ सत्तेतील राजकीय नेत्यांच्या कुटुंबियांना व गुंडांना सुरक्षा देण्यात व्यस्त असल्याने महिलांचे मंगळसूत्र चोरी, छेडाछेडीच्या घटना दिवसेंदिवस वाढत चालल्या आहेत. यासाठी पोलिसांचा मनुष्य बळ सत्ताधाऱ्यांच्या कुटुंबियांकडून व गुंडांकडून काढून घेऊन २४ तास रस्त्यावर पोलिसांचे ग्रस्त पथक वाढविण्याची मागणी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या माजी नगरसेविका नंदिनी विचारे यांच्याकडून करण्यात आली आहे.

नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील

# आदिवासी पाड्यांमध्ये पुरविण्यात येणाऱ्या नागरी सुविधांचा आढावा



नवी मुंबई : नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रामधील आदिवासी पाड्यांमधील आदिवासी बांधवांच्या समस्या व पुरविण्यात येणाऱ्या सुविधांचा आढावा घेऊन त्याठिकाणी आवश्यक सोयी, सुविधा देण्याची कार्यवाही करणेकरिता समाजविकास विभागाचे उपआयुक्त किसनराव पलांडे यांच्या अध्यक्षतेखाली वन हक्क समिती सदस्यांची चौथी बैठक नमुंमपा मुख्यालयातील विशेष समिती कक्षात संपन्न झाली.

सदर बैठकीस बेलापूर ते दिघा अशा ८ विभागांतील समिती सदस्य असलेले समाजविकास विभागाचे सहा. आयुक्त तसेच समाज विकास अधिकारी, आठही विभागांचे उपअभियंता (विद्युत, मलनि:स्सारण, स्थापत्य, पाणीपुरवठा) आणि स्वच्छता अधिकारी, समाजविकास विभागातील संबंधित अधिकारी, कर्मचारी तसेच ऐरोली विभाग वन हक्क समिती अध्यक्ष बाळू वाघे, कोपरखैरणे वन हक्क समिती अध्यक्ष रमेश डोळे, बेलापूर वन हक्क समिती श्रीम. राजश्री कातकरी, माजी नगरसेवकरामकृष्ण बेंड्या कातकरी, दिघा वन हक्क समिती अध्यक्ष जिव्या बाबल्या डांगरे, श्रीम. नंदा वाघे, श्रमजीवी संघटना, ठाणे जिल्हा उपाध्यक्ष, विकास बोंबाडे, श्रीम. रेश्मा कातकरी, सदस्य श्रमजीवी संघटना, ठाणे आदी सदस्य उपस्थित होते.

या बैठकी दरम्यान समाजविकास विभागाचे उपआयुक्तांनी समिती सदस्य यांनी मांडलेल्या बाबींचा आढावा घेऊन आदिवासी पाडयांमध्ये सोयीसुविधा पुरविणेबाबत संबंधित विभागातील वनहक्क समिती सदस्य असलेले उपअभियंता व स्वच्छता अधिकारी यांना निर्देश दिले. तसेच केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल सादर करण्याचे सूचित केले.

त्याचप्रमाणे यावेळी महाराष्ट्र शासनाच्या 'मुख्यमंत्री- माझी लाडकी बहीण' या योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत आदिवासी पाडयामधील नागरिकांमध्ये जनजागृती करून जास्तीत जास्त पात्र लाभार्थी भगिनींना योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी नियोजनबध्द कार्यवाही करणे याविषयी उपआयुक्तांनी मार्गदर्शन केले.

या बैठकीमध्ये आठही विभागांतील उपअभियंता व स्वच्छता अधिकारी यांनी संबंधित आदिवासी पाडयामध्ये सोयीसुविधा पुरविण्याबाबत कार्यवाही करून त्याबाबतचा प्रगती अहवाल वेळोवेळी उपआयुक्त, समाजविकास विभाग यांना सादर करण्यात येईल असे सांगितले. नमुंमपा क्षेत्रातील आदिवासी बांधवांच्या विकासासाठी नमुंमपा कृतीशील असून महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांचे मार्गदर्शनानुसार वन हक्क समितीमधील सूचनांच्या माध्यमातून आदिवासी पाड्यांमधील सेवासुविधांना गती देण्यात येत आहे.

डोंबिवली एमआयडीसीतील

# महिलेची उल्हासनगरच्या पती, पत्नीकडून फसवणूक

डोंबिवली : डोंबिवली एमआयडीसीतील एका उद्योजक महिला आणि इतर गुंतवणूकदारांची उल्हासनगर मधील पती, पत्नीने व्यवसायातील गुंतवणुकीच्या माध्यमातून ३१ लाख ५८ हजार ४८० रूपयांची फसवणूक केली आहे. मागील दोन वर्षाच्या काळात हा फसवणुकीचा प्रकार घडला आहे. मानपाडा पोलीस ठाण्यात फसवणूक झालेल्या महिलेने याप्रकरणी तक्रार केली आहे.

रश्मी संदीप संत असे फसवणूक झालेल्या महिलेचे नाव आहे. त्या डोंबिवली एमआयडीसीतील मिलापनगर भागात राहतात. त्या उद्योजक आहेत. विजय मुकुंद परब, दर्शना विजय परब असे फसवणूक करणाऱ्या पती, पत्नीचे नाव आहे. हे दाम्पत्य उल्हासनगर मधील व्हिनस सिनेमा समोरील गजानन नगर मधील भक्ती निवासमध्ये राहते. ते मुळचे कणकवली येथील रहिवासी आहेत.



संततधार पाऊस सुरू असतानाही ठाण्यातील गणेश मूर्तीकारांच्या कामाचा रतीब सुरूच आहे. मुर्तीकारांनी पेण येथून मूर्ती आणण्यास सुरुवात केली आहे. (छाया : मनोज सिंह)

# नवी मुंबई महानगरपालिका जिल्हास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धा पूर्व बैठकीचे आज वाशी येथे आयोजन

नवी मुंबई : महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा धोरणानुसार राज्यातील सर्व महानगरपालिकांना त्यांच्या कार्यक्षेत्रातील शालेय क्रीडा स्पर्धांना स्वतंत्र जिल्हयाचा दर्जा दिलेला आहे. त्या अनुषंगाने नवी मुंबई महानगरपालिका कार्य क्षेत्रातील शालेय क्रीडा स्पर्धांना सन २००८ पासून स्वतंत्र जिल्हयाचा दर्जा प्राप्त झाल्याने क्रीडा व सांस्कृतिक विभागाच्या वतीने स्वतंत्र जिल्हास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात येत आहे. या स्पर्धा आयोजनासाठी महानगरपालिका कार्यक्षेत्रातील विविध स्पोर्टस् असोसिएशन, जिमखाना, खाजगी शाळा व संस्था वेळोवेळी सक्रीय सहभागी होत सहकार्य करत आलेले आहेत.

केंद्र शासनाच्या स्कुल गेम फेडरेशन ऑफ इंडिया यांचेकडून सन २०२४-२०२५ या शैक्षणिक वर्षातील राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धांचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले असून त्या अनुषगांने आयुक्त, क्रीडा व युवकसेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांनी राज्यातील जिल्हा क्रीडा अधिकारी यांची बैठक घेऊन राज्यस्तरीय स्पर्धा आयोजन वाटपित केलेले आहेत.

त्यानुसार विभागीय उप संचालक, मुंबई विभाग आणि जिल्हा क्रीडा अधिकारी, ठाणे यांचे सहकार्याने, नवी मुंबई महानगरपालिका क्रीडा व सांस्कृतिक विभागाच्या वतीने सन २०२४-२०२५ या शैक्षणिक वर्षामधील जिल्हास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात येणार आहे.

या स्पर्धांमध्ये नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील शासन मान्यताप्राप्त महापालिका व खाजगी शाळा व कनिष्ठ महाविद्यालये सहभागी होऊ शकतील. याकरिता स्पर्धा पूर्व बैठकीचे आयोजन मुंबई विभागीय उप संचालक व जिल्हा क्रीडा अधिकारी, ठाणे यांचे उपस्थितीत दि.३१ जुलै, २०२४ रोजी विष्णुदास भावे नाटयगृह, वाशी येथे सकाळी ११.३० वा. करण्यात आलेली आहे.

या बैठकीमध्ये जिल्हास्तरीय स्पर्धांमध्ये सहभागी होण्याकरिता ऑनलाईन प्रणाली व नव्याने समावेश करण्यात आलेल्या विशेष बाबींविषयी माहिती देण्यात येणार असून जिल्हास्तरिय स्पर्धांचे संभाव्य वेळापत्रक जाहीर करण्यात येणार आहे. महानगरपालिकेच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या विविध योजना, कार्यक्रम व उपक्रमांबाबतची माहितीही यावेळी देण्यात येणार आहे. तसेच शासनाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांबद्दल जिल्हा क्रीडा अधिकारी, ठाणे यांचेकडून माहिती देण्यात येणार आहे.

दि. ३१ जुलै, २०२४ रोजी, विष्णुदास भावे नाटयगृह, वाशी येथे सकाळी ११.३० वा. आयोजित बैठकीस नवी मुंबई महानगरपालिका शाळांसह शासन मान्यताप्राप्त खाजगी शाळांचे प्राचार्य, मुख्याध्यापक, क्रीडा शिक्षक, क्रीडा मार्गदर्शक तसेच विविध स्पोर्ट्स असोसिएशन व जिमखाना यांचे पदाधिकारी, शासन मान्यताप्राप्त विविध खेळांचे पदाधिकारी यांनी उपस्थित राहण्याबाबत क्रीडा व सांस्कृतिक विभागाच्या वतीने आवाहन करण्यात येत आहे.

# इरशाळवाडीच्या गृहप्रकल्प हस्तांतरणाला महिनाभराची प्रतिक्षा

> मुख्यमंत्र्यांच्या सूचनेनूसार इरशाळवाडीमधील आदिवासी बांधवांचे पुनर्वसन सिडको महामंडळ करत असताना आदिवासी बांधवांच्या नवीन घरांच्या प्रकल्पामध्ये आदिवासी बांधवांना पायाभूत सोयीसुविधा महामंडळाकडून उभारल्या जात आहेत. सध्या येथील बांधकाम अंतिम टप्यात असून संबंधित प्रकल्प वेळेत पूर्ण करण्यासोबत आदिवासी बांधवांना भविष्यात पायाभूत अडचणींचा सामना करावा लागू नये म्हणून घरांचे काम दर्जेदार असण्यासोबत ते सुरक्षित असण्यासाठी मंडळाचे अभियंता विभाग काम करीत आहे. पुढील महिनाभरात हे काम पुर्ण होईल, अशी अपेक्षा आहे.
>
> – विजय सिंघल, व्यवस्थापकीय संचालक, सिडको महामंडळ

पनवेल : मागील वर्षी १९ जुलैच्या अतिवृष्टीत खालापूर येथील डोंगरावरील इरशाळवाडी दरडीखाली गाडली गेली. यामध्ये ८४ जणांनी त्यांचे प्राण गमावले. या वाडीतील बचावलेल्या १४४ आदिवासींचे पुनर्वसन करण्याची सूचना मुख्यमंत्र्यांनी रायगड जिल्हाधिकाऱ्यांना केली होती. राज्य रस्ते विकास महामंडळाने या पुनर्वसित वाडीचा आराखडा बनविल्यानंतर सिडको महामंडळाने नवीन आदिवासीवाडी बांधण्याचे काम युद्धपातळीवर हाती घेतले.

आदिवासी बांधवांसाठी ४४ पक्की घरे बांधण्याचे काम नानिवली गावात अंतिम टप्यात सूरु आहे. अजून महिनाभरात या घरांचे बांधकाम व इतर पायाभूत सुविधांचे काम पुर्ण होईल, असा विश्वास सिडको मंडळाचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी लोकसत्तासोबत बोलताना व्यक्त केला.

इरशाळवाडीवर कोसळलेल्या दरडीच्या घटनेला नुकतेच वर्ष उलटले. या घटनेमध्ये २७ जणांचे मृतदेह दरडीखालून काढले तर बचावकार्यानंतरही ५७ जणांचे मृतदेह न सापडल्याने त्यांना मृत घोषित करण्यात आल्याने मृतांची संख्या ८४ वर पोहचली. याच वाडीतील ३१ विद्यार्थी विविध आश्रमशाळेत त्यावेळेस शिक्षण घेत असल्याने ते बचावले. सरकारने १४४ आदिवासी बांधव व त्यांच्या कुटूंबियांचे या घटनेनंतर जुन्या मुंबई पूणे महामार्गालगत चौक येथे कंटेनरमध्ये तात्पुरती घरे तयार करुन आदिवासी बांधवांचे पुनर्वसन केले. मागील वर्षभरापासून हे आदिवासी बांधव येथेच राहतात.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आदिवासी बांधवांच्या पुनर्वसनात कोणतीही कमी पडू नये म्हणून वारंवार सरकारी यंत्रणेकडे आढावा घेतला आहे. सिडको मंडळाने तब्बल ३० कोटी रुपये खर्च करुन या आदिवासी बांधवांचे पुनर्वसनासाठी नवीन इरशाळवाडी उभारण्याचे काम झपाट्याने हाती घेतल्याने हे काम पुर्णत्वाकडे आले आहे. नानिवली गावातील २.६ हेक्टर जमीनीवर या नवीन इरशाळवाडीत आदिवासी बांधवांना त्यांच्या जुन्या वाडीप्रमाणे प्रशस्त घराची रचना आराखड्यात करण्यात आली आहे. नवीन प्रत्येक घराचे क्षेत्रफळ ३०० चौरस फूट असणार आहे. आदिवासी बांधवांना त्यांच्या नवीन घराच्या शेजारी मोकळी जागा आणि सर्व सोयीसुविधा कशा मिळू शकतील, या पद्धतीने सिडको मंडळाने या घरांची व घरा सभोवतालच्या परिसराचा विकास केला आहे. यामध्ये घरांसोबत रस्ते व पिण्याच्या पाण्यासोबत, प्राथमिक शाळा आणि आंगणवाडीसाठी १ हजार चौरस फूट क्षेत्रावर काम सूरु आहे. तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी तीनशे चौरस फूट जागा आणि समाजमंदीरासाठी ३०५ चौरस फूट जागेवर काम सुरू आहे. तसेच २ हजार ७२०चौरस फूट जागेवर खेळण्यासाठी मोकळे मैदान विकसित केले जात आहे. ५०० चौरस फूट जागेवर आदिवासी बांधवांसाठी बगीचा असणार आहे. हे सर्व बांधकाम अंतिम टप्यात असून संबंधित वाडी ही समुद्रसपाटीपासून उंच असल्याने भविष्यातील या वाडीला धोका उद्भवू नये म्हणून संपूर्ण वाडीला संरक्षण भिंत बांधण्याचे काम सिडकोने हाती घेतले आहे. उन्हाळ्यात या वाडीचे काम झपाट्याने सुरू होते. एक वर्ष पूर्ण होण्याअगोदर आदिवासी बांधवांना त्यांच्या घरांचा ताबा देण्याचे नियोजित होते. परंतू रायगड जिल्ह्यात पडत असलेल्या अतिवृष्टीमुळे अजून एक महिना अंतिम टप्यातील काम पूर्ण करण्यासाठी लागणार आहे.

## केवळ एक रुपयात पीक विमा उतरविण्यासाठी शेतकऱ्यांना शेवटची संधी : अंकुश माने

ठाणे : नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना आर्थिक आधार मिळावा, याकरिता येणाऱ्या प्रधानमंत्री पीक विमा योजना कृषी विभागामार्फत राबविण्यात येत आहे. योजनेत सहभागी शेतकऱ्यांना पेरणी न होणे तसेच पूर, दुष्काळ, पावसातील खंड यामुळे होणारे नुकसान, गारपीट, भूस्खलन, क्षेत्र जलमय होणे, वीज कोसळणे, ढगफुटी अशा स्थानिक नैसर्गिक आपत्तीमुळे होणारे नुकसान व काढणीनंतर शेतात सुकविण्यासाठी ठेवलेल्या पिकांचे होणारे नुकसान या सर्व बाबींकरिता विमा संरक्षण लाभणार आहे.

खरीप हंगाम २०२४ करीता शेतकरी नोंदणी करिता १५ जुलै अंतिम तारीख होती. यास आता ३१ जुलै २०२४ पर्यंत मुदतवाढ मिळाली होती. दि.२८ जुलै २०२४ अखेर ठाणे जिल्ह्यात ६३ हजार १३९, पालघर जिल्ह्यात ३९ हजार ८६१, रायगड मध्ये ३१ हजार ८०३, रत्नागिरी १० हजार ५६३ व सिंधुदुर्ग जिल्ह्यात १६ हजार ६४८ असे विभागात एकूण १ लाख ६२ हजार ०१४ शेतकऱ्यांनी विमा उतरविला आहे.

ठाणे, पालघर, रायगड व सिंधुदुर्ग जिल्ह्यात भात पीकासाठी विमा संरक्षित रक्कम (रु. / हेक्टर) – रु.५१ हजार ७६०

रत्नागिरी जिल्ह्यात भात पीकासाठी विमा संरक्षित रक्कम (रु. /हेक्टर) – रु.५० हजार

ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यात नाचणी पीकासाठी विमा संरक्षित रक्कम (रु. /हेक्टर) – रु.२० हजार

पालघर जिल्ह्यात उडीद पीकासाठी विमा संरक्षित रक्कम (रु. /हेक्टर) – २५ हजार

अधिसूचित महसूल मंडळातील अधिसूचित पीकांचाच विमा उतरवता येतो. विविध जोखमींतर्गत निश्चित होणारी नुकसान भरपाई ही केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनातील अटी व शर्तींच्या अधीन राहून निश्चित केली जाईल. शेतकरी नोंदणीसाठी शेवटचा १ दिवस बाकी असून पीक विमा संरक्षणाचा लाभ मिळविण्याकरिता शेतकऱ्यांनी आजच (३१ जुलै २०२४) विमा उतरवावा, असे आवाहन कोकण विभागाचे विभागीय कृषी सहसंचालक अंकुश माने यांनी केले आहे.










'महाराष्ट्र सम्राट' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक चंद्रकांत शंकरराव भोईटे यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲंड पब्लिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नंबर – डब्लू २३० टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरिया, कोपर खैरणे, एम.आय.डी.सी., ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई – ४००७१० येथे छापून ३०२, हार्मोनी टॉवर, भारत ज्वेलर्स समोर, नेताजी सुभाष चंद्र रोड, कोर्ट नाका, ठाणे पश्चिम – ४००६०१ (महाराष्ट्र ) येथे प्रकाशित केले. संपादक – चंद्रकांत शंकरराव भोईटे ■ RNI - MAHMAR/2012/44140 ■ मो. नं. : +९१-९१६७९५७७७१